# सद्गुरुम् तम् नमामि

८०



॥ परम पूज्य लीलाताई कर्वे॥

## ॥ एक शब्दसुमनांजली ॥



॥ श्री योगेश्वराचा जयजयकार असो॥

# सद्गुरुम् तम् नमामि:

## परम पूज्य लीलाताई कर्वे
## एक शब्द सुमनांजली

प्रकाशक

**श्री द्वारकाधीश चॅरिटीज**

श्रीद्वारकाधीश मंदिर, श्री कृष्ण लीला फार्मस्
साईहरी क्षेत्र आपटा फाटा, कर्नाळा, जि. रायगड
www.sridwarkadhish.org

प्रकाशक

**श्री द्वारकाधीश**
**चॅरिटीज**

श्रीद्वारकाधीश मंदिर, श्री कृष्ण लीला फार्मस्
साईहरी क्षेत्र, आपटा फाटा, कर्नाळा, जि. रायगड

© श्री द्वारकाधीश चॅरिटीज

❖ संपादक : अजित कारखानीस
मुंबई

❖ मुखपृष्ठ, मांडणी व मुद्रण :
सिध्दकला टाईपसेटर, मुंबई

❖ प्रकाशन : दि. २९ मे २०१४

❖ मूल्य-श्रध्दा

# प्रास्ताविक

आपल्या परमगुरु, थोर कृष्णभक्त, श्रीकृष्णस्वरुप स्व. लीलाताई कर्वे यांचा आज ८० वा जन्मदिन.

पूज्य ताईंना जवळून पाहिलेले, त्यांचा सहवास आणि कृपा दीर्घकाळ लाभलेले असंख्य कृष्णभक्त आहेत. २००९ साली पूज्य ताईंच्या पंच्याहत्तरीच्या निमित्ताने त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू, त्यांनी सांगितलेला भक्तिमार्ग, त्यांची शिकवण जनसामान्यांपर्यंत पोहचावी या उद्देशाने आम्ही काही कृष्णभक्तांना पूज्य ताईंवर लेख लिहिण्याची विनंती केली आणि त्यांनी ती आनंदाने मान्य करुन आपल्या सद्गुरुंचे यथार्थ गुणगान करणारे लेख लिहून पाठवले होते. काही लेख विविध वर्तमानपत्रांत प्रसिध्दही झाले आणि पूज्य ताईंचा संदेश लाखो घरांमध्ये जाऊन पोहचला होता.

त्या महत्वपूर्ण वर्षाची आठवण म्हणून सात लेखांचे संकलन करुन “ज्योतींनी तेजाची आरती” ही एक पुस्तिका गुरुपौर्णिमेच्या दिवशी प्रसिध्द केली होती.

या वर्षी पूज्य ताईंचा ८०वा जन्मदिवस असल्याने पूज्य ताईंच्या स्मृतीस अभिवादन करणारे लेख पाठवण्याची विनंती आम्ही पुन्हा कृष्णभक्तांना केली होती व त्यास चांगला प्रतिसाद मिळाला. पूर्वी २००९ मध्ये प्रसिध्द झालेले लेख आणि नव्याने प्राप्त झालेले लेख एकत्रित करुन “सदगुरुम् तम् नमामि” हा संग्रह आपल्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे.

खरे संत महात्मे प्रसिध्दीसाठी कधीच आग्रही नसतात. त्यांच्या पश्चातच त्यांच्या कार्याची किर्ती सर्वदूर पसरते, असे संतपरंपरेचा इतिहास सांगतो. पूज्य ताईही प्रसिध्द पराङ्मुख होत्या. त्यांनी प्रसिध्दचा कधीही ध्यास घेतला नाही. तरीही त्यांच्या कार्याची ओळख कृष्ण परिवाराबाहेरील जगाला व्हावी या उद्देशाने, त्यांच्यावरील असीम श्रध्दा, भक्ती आणि कृतज्ञतापूर्वक ही सुमनांजली त्यांचे चरणी अर्पण करीत आहोत.

२९ मे, २०१४
अजित कारखानीस
(श्री द्वारकाधीश चॅरिटीज)

# सद्गुरुम् तम् नमामि।


| अ. क्र. | शिर्षक | पान क्र. |
|---|---|---|
| १. | कृष्णछत्राची निरंतर अनुभूती देणारी "गुरुमाता" | ५ |
| २. | गुरूमाऊली । सदाकृपेची साऊली। | ९ |
| ३. | विश्वजननी ताई | १४ |
| ४. | प्रेमस्वरुप आई | १८ |
| ५. | ताई | २० |
| ६. | चालवू हा पुढे वारसा | २१ |
| ७. | I MISS YOU TAI | २२ |
| ८. | मला भावलेल्या श्रीकृष्णभक्त लीलाताई | २४ |
| ९. | विद्या आणि अध्यात्म गुरू | ३० |
| १०. | भक्तीलीला - पूज्य लीलाताई कर्वे | ३३ |
| ११. | निष्काम कर्मयोगीनी - स्व. लीलाताई कर्वे | ३७ |
| १२. | पालखी | ४१ |
| १३. | अजानवृक्षाची छाया | ४३ |
| १४. | वैद्यो नारायणो हरि: | ४६ |
| १५. | कृष्णकेंद्राची ओढ! | ५१ |

# कृष्णछत्राची निरंतर अनुभूती देणारी "गुरुमाता"

दिलीप श्रीपाद गायतोंडे
गोवा

"स्वामी तिन्ही जगांचा, आईविना भिकारी" लहानपणी या वचनाचा अर्थ समजत नव्हता, पण पूज्य ताईंच्या संपर्कात आल्यानंतर या वचनाचा खरा अर्थ गवसला. पूज्य ताईंची भेट हा तसा एक योगायोगच, पण योगायोग घडून येण्यामागेही दैवी योजना असते असेच म्हणावे लागेल. या दर्शनाने माझ्या जीवनाची दिशाच बदलून टाकली, किंबहूना जीवनात योग्य दिशा सापडली असेच म्हणणे उचित ठरेल.

एका लग्नकार्यासाठी मी कुटुंबासमवेत मुंबईला गेलो होतो. लग्नमंडपात त्या वेळी बहुतेकांना प्रतिक्षा होती ती ताईंची. त्या सर्वांनाच ताईंच्या आगमनाची हुरहुर लागलेली. अशा वेळी कोण ही ताई असा प्रश्न पडणे स्वाभाविक होते. त्यामुळे नकळत एक प्रकारची अनामिक उत्सुकता माझ्या मनात निर्माण झाली. बसल्या ठिकाणी मनात ताईंचे कल्पनेतील चित्र निर्माण होत असतानाच एका वात्सल्यमूर्तीचं आगमन समारंभस्थळी झालं. "दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती" हे वचन अनेकदा ऐकिवात होते. या वचनानुसार मी ताईंच्या समोर नतमस्तक होऊन कधी प्रणाम केला ते मलाच समजलं नाही. एक अनामिक ओढ त्या दर्शनाने मनात निर्माण झाली व त्याची प्रत्यक्ष भेट घेण्याची इच्छा ह्रदयात जागृत झाली. ती ओढ वा हुरहुर नव्हती, तर तो खरा साक्षात्कार होता याची जाणीव त्यावेळी या अजाण भक्तास नव्हती.

समारंभ संपला तरी ताईंच्या दर्शनाने त्यांच्या भेटीसाठी आसुसलेले मन अस्वस्थ झाले. दुसऱ्या दिवशी सकाळी माझे बंधू व माझी पत्नी यांच्यासोबत बदलापूरला निघालो. वेगळ्याच तंद्रीत, बदलापूरच्या त्या पवित्र वास्तुत ठेवलेल्या पावलांनी जीवनाची दिशाच बदलून टाकली. गोकुळात प्रवेश केल्याचा भास जाणवू लागला. मी स्वत:चा न रहाता श्री कृष्णाचा कधी बनलो मलाच समजले नाही.

"भाव तोची देव" या उक्तीनुसार विविध रुपांत भक्तजन भगवंतास भजतात. देवाच्या नामस्मरणाने मिळणाऱ्या आत्मशांतीची अनुभूती वेगळीच असते. भक्तीच्या कसोटीवर उतरलेल्या भक्तासच खऱ्या अर्थाने देवाचं दर्शन लाभते, नैतिक बळ मिळते व परमात्म्याचा पवित्र आशिर्वाद मिळतो, अशी अनेक उदाहरणे आपण ऐकत आलो आहोत. "फळाची अपेक्षा न बाळगता कर्म करा" भगवद्‌गीतेतील या शिकवणीनुसार नि:स्वार्थीपणे कर्म करणाऱ्या भक्तावरच दैवी कृपादृष्टी होते. देव आपल्या खऱ्या भक्तास वेगवेगळ्या रुपांत दिसल्याशिवाय रहात नाही हे खरे. फक्त ती दिव्य शक्ती ओळखण्यास निस्सीम भक्तीची गरज असते.

पूज्य ताईंच्या दर्शनाने अशाच एका दिव्य शक्तीचा साक्षात्कार झाला. परमात्म्याकडे जाण्याची वाट दाखविण्यासाठी गुरु शोधत वणवण दाहीदिशा फिरणारी माणसे आपण पाहिली आहेत, पण गुरुमाऊलींच्या दर्शनाने ध्यानीमनी नसताना मी मनातूनच त्यांचा गुरु म्हणून स्वीकार केला. त्यांच्या भेटीने शिष्यास स्वीकार केल्याचा आंतरिक आनंद मनात मावत नव्हता. त्या पहिल्याच भेटीत गुरु-शिष्याचं दृढ नातं नकळत मनात घर करून बसले ते कायमचेच.

आपल्या लहानपणापासून देवावर अढळ श्रध्दा बाळगून पू. ताईंनी भगवद्‌गीता व श्रीकृष्णाचा म्हणजेच योगेश्वराच्या तत्वज्ञानाचा प्रसार व प्रचार केला. आपल्या भक्तांना "ॐ नमो भगवते वासुदेवाय" हा मंत्र दिला. ताईंच्या देहात श्रीकृष्णाचा वास व संचार होता याची अनुभूती त्यांच्या भक्तांना वेळोवेळी येत होती. त्यांच्या मुखातून श्रीकृष्ण बोलत आहे याची प्रचिती पदोपदी जाणवत होती. त्यांची वाणी ही साक्षात योगेश्वराची वाणी याचा अनुभव अन्य भक्तांप्रमाणे मी स्वत: कित्येकवेळा घेतलेला आहे. "कृष्ण म्हणतो" असे त्या सहजपणे बोलून जायच्या. पण त्यांच्या त्या बोलण्यात व सूचनेत दैवी आदेश असायचा. आशिर्वाद असायचा. असे अवर्णनीय अनुभव वेळोवेळी अनुभवले. त्यातूनच सर्व संकटांवर मात करीत या जीवनाच्या मार्गक्रमणात तरून जाऊ शकलो. सर्व अनुभव कथन करायचा प्रयत्न केल्यास मोठं पुस्तक छापता येईल. ताईंची इच्छा व कृष्णाचा आदेश असल्यास भविष्यात ती शक्यता नाकारता येत नाही. ताईंवरील अपार श्रध्दा व योगेश्वराची निस्सीम भक्ती या भरवशावर मार्गक्रमण करताना वेळोवेळी श्रीकृष्णाने ताईंच्या मुखातून मार्ग दाखवला,

आधार दिला व भक्तांचा सांभाळ केला. कसलीही अनुकूलता नसताना पाळोळे येथे पाळोळे बीच रिसॉर्टचा व्यवसाय सुरु करण्यापासून त्याच्या विस्तारापर्यंत प्रत्येक वेळी ताईंच्या मुखातून श्रीकृष्णाचा आशिर्वाद लाभला.

जीवनाच्या वाटचालीत आणि व्यवसायात जेव्हा मोठमोठी संकटे उभी ठाकली अशा प्रसंगी ताईंचं व योगेश्वराचं ध्यान करण्यापलिकडे अन्य पर्यायच नजरेसमोर नव्हता. पण अशा कठीण प्रसंगांची आठवण आली की आजही मन गहिवरुन येतं.

ताईंच्या आशिर्वादाने पाळोले येथे सुरु केलेल्या रिसॉर्टमध्ये प्रत्यक्ष श्रीकृष्णाला येऊन राहण्याची इच्छा व्हावी हे आम्हा कुटुंबियांच भाग्य म्हणाव लागेल. भक्तांना श्रीकृष्णाचं दर्शन घेतानाच ध्यानसाधनेचा मार्ग मिळावा या उद्देशाने ताईंच्या इच्छेने योगेश्वराची संगमरवरी मूर्ती पाळोळेच्या निसर्गरम्य अशा समुद्र किनारी, पाळोळे बीच रिसॉर्टमध्ये स्थापन केली. या मूर्तीच्या रुपाने योगेश्वराचं आगमनच झाल्याने मनात परमात्म्याचं सुरक्षाकवच निर्माण झालं. व्यवसायात आलेली मोठ-मोठी संकटे येऊन योगेश्वराच्या पायाशी येऊन थांबली. याचा अनुभव अनपेक्षित व अवर्णनीय होता. संकटाची चाहुल घेऊन येणारी व्यक्ती कधी कृष्णभक्त निघाली तर ओळखपाळख नसतानाही कृष्णभक्त या नात्याने कारवाईसाठी आलेली व्यक्ती श्रीकृष्ण दर्शन घेऊन परतली. ही सर्व योगेश्वराची किमया. आज मी जो काय आहे ती सर्व योगेश्वराचीच कृपा.

आपल्या साक्षात्काराचा फायदा समस्त मानवजातीस मिळावा या उदात्त हेतूने ताईंनी देशातच नव्हे तर विदेशातही जाऊन श्रीकृष्ण लीला केंद्रांची स्थापना केली. आमच्या केंद्रात बसून ध्यान करताना वेगळेच आत्मिक समाधान लाभल्यावाचून राहत नाही. ताईंच्या दिव्यत्वाचे तसेच श्रेष्ठत्वाचे अनेक अनुभव आम्ही कुटुंबियांनी व भक्तांनी वेळोवेळी घेतले आहेत. त्याच अनुभवांतून ताईंवरील श्रध्दा अधिक दृढ होत गेली. त्याच उद्देशाने या केंद्राची स्थापना झाली. कृष्णभक्तांना ध्यान, भक्ती व साधनेची वाट मोकळी करुन देण्याच्या उद्देशानेच ताईंनी या केंद्रास ज्या ज्या वेळी भेट दिली त्यावेळी शेकडो भक्त मोठ्या उत्कंठतेने त्यांची आतुरतेने वाट पहात. कित्येक भक्तांचे "ताई" हे भक्तीस्थान व श्रध्दास्थान बनले.

"आधी प्रपंच करावा नेटका, मग परमार्थ साधावा" हे संतवचन असले तरी

ताईंचे कार्य पहाता त्यांनी आपला संसार व कुटुंब सांभाळून स्वतःची साधना व सिध्दी यांच्या बळावर सर्वांना श्रीकृष्ण भक्तीचा मार्ग दाखविला, असंख्य भक्तांच्या गुरुमाता बनल्या. भक्तांची भक्तीच गुरुला गुरुपद देत असते असे म्हणतात, त्याप्रमाणे आम्हा सर्व भक्तांच्या हृदयात त्यांनी गुरुपद मिळविले.

पृथ्वीतलावर अवतार घेऊन प्रकट होणाऱ्या भगवंताचाही वेळ-काळ ठरलेला असतो. मग त्यास ताई तरी अपवाद कशा असतील? आम्हा भक्तांना श्रीकृष्ण भक्तीचा मार्ग दाखवून आयुष्याच्या दिशा ठरवून देण्याचं ताईंच कार्य पूर्ण झालेलं असावं, कदाचित त्यांना परत येण्याचा आदेश आलेला असावा. म्हणूनच त्यांनी इहलोकीची यात्रा संपविली. ज्यांच्या आशिर्वादाने व ज्या कृष्णछत्रात मी घडलो त्या ताईंची अखेरच्या क्षणापर्यंत सेवा करण्याचं भाग्य मला लाभलं. त्यांच्या महानिर्वाणाच्या वेळी मी स्वतः दिल्लीत त्यांच्यासोबत असणे हा योगायोग. अंतिम क्षणापर्यंत त्यांची सेवा करण्याची संधी मला लाभणे हे माझ्या भक्तीचं लाभलेलं फळ असच म्हणावे लागेल.

आणखी एक नमूद करण्याजोगी महत्वाची गोष्ट म्हणजे भगवद्गीतेबद्दल ताई म्हणायच्या, गीतेची महती व महत्व कधी सांगून पटण्यापेक्षा स्वतः अनुभवाने ती मिळवावी. ताईंनी पंचवीस वर्षांपूर्वी मला खिशात ठेवता येईल अशा आकाराची छोटी गीता दिली. मी रोज ती वाचायचो, आता बरीच वर्षे वापरल्याने ती वाचता येत नसली तरी मी सदोदित खिशात बाळगतो. ती हातात धरुन ध्यान करताना ताईंनी दिलेली गीता हा नुसता ग्रंथ नसून ते एक सुरक्षा कवच असल्याची अनुभूती मिळते. अशा प्रकारे गीता सदोदित स्वतःजवळ बाळगून शक्य असल्यास नित्यनेमाने वाचन केल्याने जे आत्मिक बळ मिळते ते अनुभवल्याचे मी मित्रांना आवर्जून सांगतो.

आज ताई आपल्यात नाहीत, तेव्हा एखादा दुसरा गुरु पहावा असा विचारही कधी मनाला शिवला नाही. कारण मुळात ताई जरी शरीराने आमच्यात नसल्या तरी ज्या ज्या वेळी भक्तीभावाने डोळे मिटून ध्यान करतो त्यावेळी आजही ताईंच्या मुखातून श्रीकृष्ण बोलतो. आम्हा भक्तांना मार्ग दाखवतो - बळ देतो - धैर्य देतो. आशिर्वाद देणाऱ्या ताई जरी नसल्या तरी त्यांच्या आशिर्वादाचे कृपाछत्र आजही आम्हा भक्तांवर आहे यात शंकाच नाही. आपल्या कृपाछत्राची निरंतर अनुभूती देणाऱ्या गुरुमातेस कोटी कोटी प्रणाम!

# गुरूमाऊली ।
# सदाकृपेची साऊली।

अजित कारखानीस
मुंबई

गुरुपरंपरेत गुरुला 'गुरुमाऊली' असे संबोधतात कारण आई म्हणजे प्रेमाचा, वात्सल्याचा मूलस्त्रोत आणि गुरु हा भक्तांसाठी माता, पिता, त्राता असतो. त्याच्या कृपेची, मायेची पाखर सदासर्वदा भक्तांवर सावलीसारखी विराजमान असते. आमच्या गुरू परमपूज्य लीलाताई हेही एक असच प्रेमस्वरूप आणि वात्सल्यमूर्ती आईचे रुप होत. गोव्यातील मंगेशी येथे एका सर्वसामान्य पण भक्तिपरायण कुटुंबात ८० वर्षांपूर्वी जन्मलेली 'लीला' पुढे लीलाताई झाली. असंख्य भक्तांची आई झाली. बालवयातच कृष्णाशी संवाद साधणाऱ्या लीलाताईंचे सारे जीवनच कृष्णमय झाले.

माझा आणि पूज्य लीलाताईंचा परिचय १९८८ मध्ये झाला आणि २००३ साली झालेल्या त्यांच्या महानिर्वाणापर्यंतच्या १५ वर्षांच्या सहवासात मी आणि माझ्या कुटुंबियांनी अनेक विस्मयकारक प्रसंग अनुभवले. लीलाताईंचे मुखातून कृष्ण बोलतो म्हणून त्यांचेकडे आपल्या प्रापंचिक अडचणींचे प्रश्न घेऊन येणारे असंख्य कृष्णभक्त, त्यांना कृष्णाने दिलेली समर्पक उत्तरे हे सारे डोळयांनी प्रत्यक्ष पाहिले. जन्मभर प्राथमिक शिक्षिकेची नोकरी करताना लीलाताईंनी असंख्य बालचमुंवर संस्कार करता करता सर्वसामान्यांना रूचेल, पचेल असा कृष्णभक्तीचा मार्ग भक्तांना दाखवला. कृष्णाला कर्तव्य प्रिय आहे, आपल्या कर्तव्यात कधी कसूर करु नका असे ठासून सांगणाऱ्या ताई स्वत: अत्यंत कर्तव्यतत्पर होत्या.

बदलापूरचे कृष्णकुटीर ही पूज्य ताईंची कर्मभूमी. प्रापंचिक समस्यांचे ओझे घेऊन ताईंचे मार्गदर्शन घेण्यसाठी आलेल्या भक्तांना कृष्णकुटीरमध्ये पाऊल टाकताच आपल्या डोक्यावरच निम्म ओझं उतरल्यासारख वाटे. तिथलं पवित्र वातावरण, अगत्य, साधेपणा पाहूनच त्यांच मन शांत होई. एखाद्या अत्यंत ज्वलंत प्रश्नाला "माझी जबाबदारी" हे कृष्णाने दिलेले सात अक्षरांतले उत्तर म्हणजे आम्हा

कृष्णभक्तांना साक्षात परब्रह्माचे आश्वासन वाटे आणि या वचनाने बांधला गेलेला कृष्ण खरोखरच भक्तांवरील संकटाचे निवारण करीत असे. ताई आणि कृष्ण, कृष्ण आणि ताई हे एकमेकांशी एवढे एकरूप झाले होते की त्यांचे भिन्न रूप आम्हाला कधी दिसलेच नाही. कृष्ण म्हणून बोलताना त्यांच्या आवाजात होणारा बदल तेवढा जाणवत असे.

ताईंचे कृष्णकुटीर हे सर्व भक्तांचेच घर होते. येणाऱ्या भक्ताची ताई केवळ प्रेमाने विचारपूसच करीत नसत तर त्यांना स्वत: चहापाणी देत, प्रेमाने जेवू घालत, इथल्या प्रसादाची चव वेगळीच असे. येणाऱ्या भक्तांना ताई साधा सोपा, अगदी सरळ भक्तीमार्ग सांगत. कृष्णाला रोज सात अख्खे तांदूळ वाहा, संकटाचे वेळी २ निळी फुले वाहा, **"ॐ नमो भगवते वासुदेवाय"** या कलियुगातील मंत्राने मला साद घाला, गीतेचे वाचन करा, यासारखे साधे सोपे उपाय, पण त्यामुळे आपल्या पुढील गहन प्रश्न कसे सुटणार ? असा काही भक्तांना प्रश्न पडे. ते त्यामुळे सांगितलेलं कधी सातत्याने न करता पुन्हा तोच प्रश्न घेऊन येत, तेव्हा त्यांची लबाडी कृष्णापुढे उघडी पडे. मी सांगितलेलं तू केलं नाहीस, ते आधी कर आणि मगच परत ये, असे कृष्ण खडसावून सांगे. ताईंना मनापासून केलेली भक्ती आणि तिच्यातील सातत्य अपेक्षित होते. कर्मकांडाचा आग्रह त्यांनी कधीच धरला नाही. आत्म्याला क्लेश देऊन मी कधीच प्रसन्न होत नाही, असे सांगून त्यांनी मला सर्व उपवास सोडायला सांगितले आणि माझा आम्लपित्ताचा विकार बरा झाला.

पूज्य ताईंकडे येणाऱ्या भक्तांचे आराध्य दैवत वेगवेगळे असे. कुणी शिवभक्त, तर कुणी स्वामीभक्त, साईभक्त, पण "मी यत्रतत्र सर्वत्र आणि जळीस्थळी, काष्ठी, पाषाणी भरलो आहे. तुमच्या आराध्य दैवताच्या रूपातच तुम्ही मला पहा" असे कृष्ण त्यांना सांगे. तुमचे श्रध्दास्थान एकच असले पाहिजे, असं पूज्य ताई ठासून सांगत. पण इथे "स्थान" याचा अर्थ स्थळ नसून आराध्यदैवत अथवा गुरु असा अभिप्रेत असे. कुलदेवतेच्या उपासनेबाबत मात्र ताई आग्रही होत्या. कुलदेवता ही कुलाची माता, तिची भक्ती आणि उपासना नित्यनियमाने झाली पाहिजे, असे कृष्ण ताईंच्या मुखातून भक्तांना सांगे. शैव आणि वैष्णव असा वाद ताईंच्या कृष्णकुटीरमध्ये कधी नव्हताच. कारण इथे एकाच पीठावर कृष्ण आणि शिव विराजमान आहेत. कृष्णाशेजारीच शिवलिंगावर अभिषेक होतो, तुलसी

एकाच वेळी कृष्णाला आणि शिवाला वाहिले जातात. जन्माष्टमीबरोबर महाशिवरात्रही साजरी होते.

पूज्य ताईंच्या प्रेरणेने देशात अनेक मंदिरांची स्थापना झाली. अनेक भक्तांकडून त्यांनी मंदिरांची उभारणी करुन घेतली. आपटा फाटा, कर्नाळा येथील "श्रीद्वारकाधीश मंदिर", नाशिकजवळील सय्यद पिंपरीचे "श्री गोवर्धन मंदिर", उरळीकांचनजवळील डाळिंबचे "गोकुळ मंदिर" या मंदिरांतील मूर्तींची पू. ताईंचे हस्तेच प्रतिष्ठापना झाली. २००२ मध्ये पूज्य ताईंनी विश्वजननी नवदुर्गेच्या नऊ मंदिराची उभारणी करण्याचा संकल्प सोडला होता. त्यापैकी पहिले मंदिर अमेरिकेला लॉस एंजलीस येथे २००२ मध्ये स्थापन झाले. ८ फेब्रुवारी, २००३ रोजी नवी दिल्ली येथे पू. ताईंचे हस्ते विश्वजननीची स्थापना झाली. पू. ताईंचे महानिर्वाणानंतर मुंबई जोगेश्वरी येथे, कर्नाटकात हळदीपूर येथे, तसेच पुणे, बदलापूर,रत्नागिरी, रांची येथेही विश्वजननी नवदुर्गेच्या मंदिरांची विधीपूर्वक प्रतिष्ठापना करण्यात आली. कलियुगात शक्तीची उपासनाही महत्त्वपूर्ण आहे, असे सांगून त्यांनी "ॐ महान शक्ती देवताय नमः" हा मंत्र भक्तांना दिला.

आपटा फाटा येथील श्रीद्वारकाधीश मंदिराची उभारणी त्यांनी माझ्याकडून करून घेतली. साईहरि क्षेत्र आपटा फाटा येथील निसर्गरम्य वातावणातील भव्य द्वारकाधीश मंदिर आणि त्यातील भगवान श्रीकृष्णाची मोहक मूर्ती यांनी आजवर हजारो भक्तांना मोहवून टाकले आहे. १२ डिसेंबर, १९९६ या दिवशी पूज्य ताईंचे हस्ते व थोर स्वामीभक्त स्व. पूज्य नानामहाराज परांजपे यांच्या उपस्थितीत द्वारकाधीशाची प्रतिष्ठापना झाली. यावेळी पूज्य ताईंनी उपस्थितांना संबोधताना साक्षात भगवान कृष्णाच्याच शब्दांत भक्तांना असे वचन दिले की त्यांच्या योगक्षेमासाठी तो इथे सदैव उभा आहे. भक्तांना संबोधताना पूज्य ताई म्हणाल्या "अठरा वर्षांपूर्वी मी कृष्णकुटीरमध्ये उभा राहिलो, तो कृष्णभक्तांसाठी. पण आज माझ्या कार्याची व्याप्ती वाढली असून इथे मी सर्वसामान्य भक्तांसाठी उभा आहे आणि त्यांनी साद घालताच मी त्यांच्या हाकेला धावून येईन हे माझे वचन समजा. माझा आवडता प्रसाद म्हणजे सुदाम्याचे पोहे. तो मला माझ्या भक्तांना या ठिकाणी वाटायचा आहे." श्रीद्वारकाधीश मंदिरात साजरे होणारे उत्सव, तिथे होणारी संगीत व

नृत्यसेवा, किर्तने, प्रवचने, त्यात सहभागी होणारे शेकडो भाविक पाहिल्यानंतर पूज्य ताईंच्या उद्गारांची प्रचिती येते. द्वारकाधीश मंदिरातील ध्यानमंदिरातील शांत व पवित्र वातावरणाने अनेक भक्त भारावून जातात.

द्वारकाधीशाच्या प्रतिष्ठापनेनंतर तीन महिन्यांतच पूज्य ताईंच्या आशिर्वादाने द्वारकाधीश मंदिराचा सार्वजनिक ट्रस्ट करण्यात आला. "श्री द्वारकाधीश चॅरिटीज" या विश्वस्त न्यासाला मुंबईला महालक्ष्मी मंदिरात कृष्णाने आशिर्वाद दिले. ट्रस्ट या कल्पनेला पूज्य ताईंचा तत्त्वतः विरोध होता खरे, पण द्वारकाधीश मंदिरात भविष्यकाळात घडणाऱ्या कार्याची व्याप्ती जाणून ताईंनी ट्रस्ट करण्यास नुसती संमतीच दिली असे नाही तर वैभवी श्रॉफ व संतोष कर्वे या आपल्या मुलांनाही ट्रस्टवर काम करण्यास अनुमती दिली होती.

पूज्य ताईंच्या महानिर्वाणानंतर या ध्यानमंदिरात पू. ताईंची पवित्र रक्षा, सर्व धर्मग्रंथ आणि विविध यागांच्या विभूती यांची भूमीत प्रतिष्ठापना करुन त्यावर सुंदर कमल विराजित पादुकांची स्थापना करून पू. ताईंचे समाधीस्थान बांधण्यात आले आहे. १ मे, २००४ रोजी पेण येथील स्व. स्वामी अमलानंदांचे उत्तराधिकारी स्व. स्वामी सहजानंद यांचे हस्ते या समाधीचे अनावरण झाले. या समाधीस्थानाला नुकतीच १० वर्षे पूर्ण झाली. १ मे, २००४ रोजी पू. ताईंचे नावाने **श्रीलीला चिकित्सालय** या एका वैद्यकीय सेवा केंद्राची स्थापना झाली होती. या केंद्रामार्फत आजवर ७,५०० हून अधिक रूग्णांवर उपचार केले गेले. विविध वैद्यकीय शिबीरांतून ४,००० पेक्षा अधिक रुग्णांची मोफत तपासणी करून त्यांचेवर उपचार केले गेले. या वैद्यकीय सेवा केंद्राचा विस्तार करुन रुग्णांना वैद्यकीय आणिबाणीच्या काळात प्राणवायू प्रदान करणे, हृदयरेखा आलेख यांसारख्या सुविधांबरोबर अत्यवस्थ रूग्णांना रूग्णवाहिकेतून पुढील उपचारांसाठी नजिकच्या रूग्णालयात नेण्यासाठी एक रूग्णवाहिकाही सज्ज ठेवण्यात आली आहे. जनसेवा हीच ईश्वर सेवा, हे ब्रीद मानून श्री द्वारकाधीश चॅरिटीज या विश्वस्त न्यासामार्फत या सेवा पुरवल्या जातात. पूज्य ताईंनी त्यांचे हयातीत असंख्य रूग्णांसाठी ध्यानधारणा करुन त्यांना जीवनदान दिले होते. त्यांच्या मनात रूग्णांविषयी असणारी कणव आणि आपुलकी हाच आदर्श मानून या वैद्यकीय सेवा पुरवल्या जातात. पू. ताईंचे कार्य केवळ काही मर्यादित

उत्सवांपुरतेच मर्यादित न ठेवता ते सर्वव्यापी व सर्वस्पर्शी व्हावे हीच यामागची भावना आहे.

पू. ताईंनी आपला कोणीही उत्तराधिकारी नेमलेला नाही. त्यांचे कार्य हे त्यांनी स्थापना केलेल्या कृष्णकेंद्रांमार्फत चालू आहे. पू. ताईंनी सामुदायिक उपासनेची कल्पना मांडली. सध्याच्या कलीयुगात समाजावर येणाऱ्या नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींपासून सर्वांचे रक्षण व्हावे म्हणून "ॐ नमो भगवते वासुदेवाय" हा कलियुगातील तारक मंत्र त्यांनी भक्तांना सांगितला. या मंत्राच्या उच्चाराने तुम्ही माझ्याकडे येण्यासाठी एक पाऊल पुढे टाकलेत तर मी सहस्त्र पावलांनी तुमच्याकडे धावत येईन. श्रध्दा आणि विश्वासाने मला आत्मसात करा. प्रेमाने मला जिंका. दुसऱ्याचे आनंदात आपला आनंद माना असा साधा, सोपा भक्तीमार्ग त्यांनी भक्तांना सांगितला. आज इंग्लड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, केनिया,नायजेरिया, दुबई, दोहा, मस्कत, जपान इत्यादि देशांत व भारतात मिळून ४०० हून अधिक कृष्णकेंद्रे कार्यरत आहेत.

पंधरा वर्षांच्या सहवासात पूज्य ताईंची असंख्य रूपे मी पाहिली. संकटकाळी भक्ताला काळजी करु नकोस, मी पाठीशी उभा आहे, असं खंबीर आश्वासन देणाऱ्या ताई. भक्त आजारी पडला की कधीकधी केवळ घोट दोन घोट पाणी प्राशन करुन त्याचेसाठी ध्यानधारणा करणाऱ्या, त्याला आजारातून पुन्हा उभ्या करणाऱ्या भक्तवत्सल ताई. भक्तांच्या घरी एखादी आनंदाची घटना घडली की आनंदित होणाऱ्या ताई. गिरणीकामगारांच्या संपामुळे हजारो कामगारांचे संसार उध्वस्त होत असल्याचे पाहून अस्वस्थ झालेल्या आणि त्याच अवस्थेत संबंधित कामगार नेत्याला त्याच्याच वसाहतीत जाऊन जाब विचारणाऱ्या निर्भिड ताई. देशाच्या सीमेवर अणुयुध्दाचे ढग जमले असताना पंजाब, लडाख, आसाम आणि केरळ या चतु:सीमांवर जाऊन देशाच्या रक्षणासाठी प्रार्थना करणाऱ्या देशभक्त ताई अशी त्यांची कितीतरी रूपे आम्ही कृष्ण परिवारातील भक्तांनी पाहिली. महानिर्वाणानंतरही असंख्य भक्तांच्या हृदयात अढळ "ध्रुवपद" लाभलेली ही वात्सल्य सिंधू आई अजरामरच राहिल.

+ + +

# विश्वजननी ताई

मयुरेश
बदलापूर

परम पूज्य लीलाताई, संतपरंपरेतील एक जीवनपुष्प! मडकई गावात शांतादुर्गा मंदिराच्या धार्मिक वातावरणात, आर्थिकदृष्ट्या गरीब पण संस्कारांनी श्रीमंत अशा घरामध्ये जन्मलेली मुलगी. नवदुर्गा तुझ्या पोटी जन्माला येणार असा दृष्टांत तिच्या आईला तिच्या जन्माच्यावेळी झाला होता. शांतादुर्गा पाठीशी आहे असा आशीर्वाद तिला मिळाला. मामांच्या माध्यमातून कृष्णभक्तीशी परिचय झाला आणि साक्षात जगद्‌गुरु श्रीकृष्णच गुरु म्हणून लाभला. लहानपणीच वडिलांचे छत्र हरपले, मग गरिबीचे चटके सोसत ताईंनी मोठ्या कष्टाने आपले लौकिक शिक्षण पूर्ण केले. कृष्णाच्याच भरवश्यावर नोकरी व विवाह होऊन बाबांबरोबर मध्यमवर्गीय संसार सुरु झाला. आईने दिलेल्या संस्कारांनी, आलेली माणसे जोडण्याचा व जपण्याचा आदर्श, दारातील चपलांवरुन माणसाची श्रीमंती ठरवण्याची वृत्ती, यामुळे ताईंना कधी धनाचा मोह झाला नाही. दारी आलेल्या व्यक्तीचे हसतमुखाने स्वागत करण्याचा, चहा, नाष्टा वा जेवण, काहीतरी दिल्याशिवाय परत न पाठवण्याचा गृहस्थाश्रमी धर्म पाळतानाच ताईंनी बदलत्या काळाची गरज, संसाराला हातभार म्हणून प्राथमिक विद्यालयात शिक्षिकेची नोकरीही केली. शाळेत विषय शिकवण्याची हातोटी, प्रेमळ स्वभाव पण प्रसंगी कर्तव्यकठोरता, गुणग्राहकता यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर संस्कारही दिले. सर्वसामान्य मध्यमवर्गीय गृहिणींना भेडसावणारी संकटे झेलताना ताईंनी कधीही कुरकुर केली नाही. आपली पत्नीची व शिक्षिकेची भुमिका पार पाडताना एकीकडे आपली कुलदैवतेची उपासना, वैयक्तिक साधना व श्रीकृष्णाच्या मार्गदर्शनाखाली गीताप्रसाराचे कार्य चालू ठेवले. बाबांचेही त्यांना पूर्ण सहकार्य लाभले. "संसाररुपी रथाची पती-पत्नी ही दोन चाके आहेत" या उक्तीचाच प्रत्यय त्यांच्या संसाराकडे पाहून येत होता. आपल्या धर्मात पत्नीला सहधर्मचारीणी असे संबोधले आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हा चतुर्विध पुरुषार्थ साधणे हे पती-पत्नीच्या

संमती वा सहमतीशिवाय शक्य नाही हा विचार गृहस्थाश्रमाचा आधार आहे, हा महत्वाचा संदेश त्यांनी आपल्या आचरणातून दिला. त्यांच्या या कर्मनिष्ठेने प्रसन्न होऊन श्रीकृष्णाने त्यांना आपल्या कार्याचे माध्यम म्हणून निवडले. त्या दोघांची वेळोवेळी परीक्षाही घेतली. ताईंनी बाबांच्या अकाली निधनानेही खचून न जाता उलट कृष्णावर अढळ श्रध्दा ठेवत हिंमतीने मुलांना स्वतःच्या पायावर उभे केले. श्रीकृष्णालाच आपले सर्वस्व मानले. त्याचा शब्द अखेरचा मानला. श्रीकृष्णाचा विचार आपला विचार मानला, त्यामुळे श्रीकृष्णाने ताईंची "ध्यानमूर्ती" म्हणून निवड केली.

श्रीकृष्णाच्या आदेशाने कृष्णभक्तांच्या प्रापंचिक अडचणी सोडवताना खडतर नियमांचे पालन न चुकता करताना त्यांनी स्वतःच्या वैयक्तिक जबाबदारीची सबब कधीही येऊ दिली नाही. श्रीकृष्णाच्या संदेशाने कृष्णभक्तांना अध्यात्मिक मार्गदर्शन करताना कधीही स्वतःचा बडेजाव न दाखवता त्या सर्व श्रेय श्रीकृष्णालाच अर्पण करत. "मी एक सामान्य स्त्री, सर्व काही तो लाडोबा श्रीकृष्ण करतो" ही भावना त्यांच्या शब्दांतूनच नव्हे तर वागण्यातूनही जाणवायची. श्रीकृष्णाशी त्यांचा नित्यसंबंध इतका अकृत्रिम, इतका सहज होता की कृष्णा ये रे या त्यांच्या हाकेसरशी ते सावळे परब्रह्म ६-७ वर्षांच्या गोंडस बालकाचे रुप धारण करुन तेथे दुदु प्यायला, मंमं करायला किंवा बुड्डबुड्ड करायला दुड्डदुड्ड धावत येत असेल याबद्दल तेथे हजर असलेल्या कुणाच्याही मनात शंका येत नसे. कृष्णाचे कौतुक सांगताना हरवून जाताना, येणारा त्यांचा वात्सल्याने भरुन वाहणारा आर्जवी स्वर मायेने भिजवत सुखावत असे, पण त्या कृष्णमय झाल्यावर त्यांच्या आवाजात येणारी जरब, परखडपणा हा कुणाचाही अंतर्बाह्य थरकाप उडवत असे. त्यांचा थोडा सहवास लाभलेल्या सामान्य माणसालाही त्यांचे हे अद्वैतातील द्वैत स्पष्टपणे जाणवत असे.

ताईंनी सर्व कृष्णभक्तांना "ॐ नमो भगवते वासुदेवाय" हा गुरुमंत्र दिला. आठवड्याची उपासना दिली. कित्येक साधकांना वैयक्तिक साधनेबद्दल मार्गदर्शन केले. सगळ्यात महत्वाचे म्हणजे भगवद्गीतेचा कालानुरुप अर्थ त्यांनी ना केवळ समजावून सांगितला तर जगून दाखवला. संतांचे खरे लक्षण म्हणजे संपूर्ण मानव जातीविषयी त्यांना वाटणारी कळवळ. उलथापाथीने, अस्थिरतेने भरलेल्या जगात शांतता नांदावी यासाठी ताईंनी कितीतरी वेळा कठोर ध्यान केले. आपल्या

भारतदेशाविषयी तर त्यांना फारच काळजी वाटत असे. त्यामुळे देशाच्या सुरक्षेसाठी त्यांनी चारही सीमांवर जाऊन ध्यान केले, देशासाठी प्राण वेचणाऱ्या जवानांसाठी ध्यान केले. देशातील महत्त्वाच्या व्यक्तींना भेटून त्यांना मार्गदर्शन केले. शिव, शक्ती आणि परमात्मा श्रीकृष्ण यांची सामुदायिक उपासना ही आजच्या काळाची गरज आहे. ती पूर्ण होऊन श्रीकृष्ण कार्यासाठी शक्ती मिळावी यासाठी ताईंनी शेकडो श्रीकृष्णलीलाकेंद्रांची भारतात व विदेशात स्थापना केली.

देशासाठी कार्य करण्यासाठी "माझी भिस्त ही यंग जनरेशनवर आहे" असे श्रीकृष्ण वारंवार त्यांच्या मुखातून बोलत असे. त्यामुळे ताईंनी कार्याचा भर देशप्रेमाने भारलेली संस्कारित तरुणपिढी तयार करण्यावर दिला. त्यासाठी ताईंनी इंपेशंट यंग जनरेशनसाठी वेगळी कमी वेळाची उपासनाकेंद्रे सुरु केली. आय.आय.टी.सारख्या संस्थांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उपासनेचा सोपा मार्ग दिला. आयुष्यात चांगले होण्यासाठी वेळ यावी लागते, वाट पाहावी लागते हे पटवून दिले. १०वी, १२वी च्या परीक्षांचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्व जाणून त्या परीक्षांच्या वेळी ताई सर्व विद्यार्थ्यांसाठी ध्यान करत असत. मुलांवर चांगले संस्कार होण्यासाठी घरातील स्त्रीची जबाबदारी ओळखून त्यांनी स्वत:चेच उदाहरण भक्तांसमोर ठेवले. केंद्राची उपासना, आठवड्याची उपासना, रोज दिवेलागणीच्या वेळी देवासमोर दिवा लावून रामरक्षा, शुभं करोति सारखी स्तोत्रे म्हणणे, संकटाच्या वेळी देवा समोर दिवा लावणे, "ॐ नमो भगवते वासुदेवाय" हा मंत्र ११ वेळा म्हणून श्रीकृष्णाच्या पायाशी धरलेले पाणी तीर्थ म्हणून घेणे, यासारख्या साध्या उपायांनी अडचणींवर मात करुन आपली श्रध्दा बळकट करुन पुढच्या पिढीवर आस्तिकतेचे संस्कार करावेत असे ताई आवर्जून सांगत.

संस्कारांनी व्यक्तिविकास, कुटुंबाचा विकास, समाजाचा विकास, राष्ट्राचा विकास, विश्वाचा उत्कर्ष अशी त्यांची संस्कारकेंद्रांमागची दूरदृष्टी होती. श्रीकृष्णकेंद्रांच्या माध्यमातून संस्कारांत वाढलेली यंग जनरेशन हीच कृष्णकार्याचा आधार बनेल असा त्यांचा ठाम विश्वास होता. क्षुल्लक वैचारिक मतभेदांमुळे घटस्फोट होण्याच्या काळात संस्कारांच्या माध्यमातून विवाहसंस्था, कुटुंब व्यवस्था वाचवून समाज, देश वाचवण्याची वैश्विक दृष्टी देणाऱ्या या असामान्य अशा सामान्य

गृहिणी ताईंची श्रीकृष्णाने विश्वजननी म्हणून निवड करणे व तिने श्रीकृष्णाबरोबरीने कार्यासाठी उभी राहणे यातच सर्व संस्कारी स्त्रियांचा सन्मान सामावला आहे. प्रत्येक व्यक्तिच्या आयुष्यात काळजी वाहणारी आई पहिला गुरु असते. विश्वशांतीसाठी अविरत प्रयत्नरत ताई पुढे विश्वजननी होणे ही योगेश्वराचीच इच्छा होती.

भगवद्‌गीतेचा काळानुरुप अर्थ लावून ती आचरणात कशी आणायची हे स्वतः जगून दाखवणाऱ्या गुरु आपल्याला लाभल्या हे आपले भाग्य आहे. पण त्याही पुढे जाऊन आपले सद्‌गुरुप्रती असणारे उत्तरदायीत्व वाढवणारे आहे. घरासाठी असलेली आपली कर्तव्ये पार पाडतानाच ताईंच्या विचारांचे संस्कारधन पुढे घेऊन जाण्याची धूरा आपल्या शिरी आहे हे विसरता येणार नाही. ताईंचे अध्यात्मिक, शैक्षणिक, वैद्यकीय जनसेवेचे कार्य त्यांच्याच प्रेरणेने स्थापन झालेल्या विश्वजननीमंदिर व श्रीकृष्णलीलाकेंद्रांमार्फत तसेच श्री द्वारकाधीश न्यासातर्फे पुढे चालू आहे. कोणत्याही व्यावहारीक अडचणींची सबब न सांगता या कृष्णकार्यासाठी आपण पुढे आले पाहिजे, त्यात सहभागी झाले पाहिजे, हीच आपली त्यांना खरी गुरुदक्षिणा ठरेल.

गुरुः ब्रह्मा गुरुः विष्णु। गुरुः देवो महेश्वरः
गुरुः साक्षात् परब्रह्म। तस्मै श्री गुरवे नमः

महारुद्रपठणाने आपण ताईंच्या समाधीवर अभिषेक करु पण त्यांनी लावलेल्या कार्यरुपी रोपट्याचा आपल्या कृतिभक्तीच्या अभिषेकाने जेव्हा मोठा वृक्ष होईल तेव्हाच आपल्या विश्वजननीची कूस धन्य होईल. ताईंच्या माध्यमातून कृष्णकृपेचा लाभ घेतलेल्या आपल्या सर्वांवर ही वैयक्तिक जबाबदारी आहे, गुरुऋण आहे हे विसरता येणार नाही.

✣✣✣

# प्रेमस्वरुप आई

अनिता सदरेसाई
पुणे

"प्रेमस्वरुप आई, वात्सल्य सिंधु आई। बोलावू तूज आता मी कोणत्या उपायी ? पूज्य ताईंच्या पश्चात असंख्य कृष्णभक्तांच्या मनात ही विरहाची भावना निर्माण झाली. कृष्णपरिवाराचे अपरिमित नुकसान झाले. त्यांच्या अकस्मित निर्वाणाने झालेली पोकळी कधीच भरुन निघाली नाही. पूज्य ताईंच्या असंख्य आठवणी अजूनही मनात ताज्या आहेत.

पूज्य ताईंच्या रुपात मला जणू माझी आईच भेटली. माझे लग्न झाल्यानंतर अल्पावधीतच मी मातृसुखाला मुकले. नवीन घरात रुळायला प्रत्येकालाच वेळ लागतो. त्यात मला बहिण-मावशी-आत्या असे जवळचे कोणी नव्हते. दोह्याला ताईंची भेट झाली. प्रथमदर्शनीच मला खूप आनंद झाला. दोह्यात देऊळ वगैरे काही नव्हते. मी घरातच देवाचे करायचे. "अगं! मी तुझ्याबरोबर असतो पण तुला कळत नाही" असे ताईंनी मला प्रथमदर्शनीच सांगितलं तेव्हा आठवलं कृष्ण कोणकोणत्या रुपाने येऊन मला मदत करत होता. माझ्या पहिल्या बाळंतपणाच्यावेळी माझ्या मैत्रिणी घरी येऊन जेवण-धुणी-भांडी सर्व करुन जायच्या किंवा जेवणाचा डबा घेऊन यायच्या. सर्व श्रीमंत होत्या पण प्रेमाने त्या हे सर्व करायच्या. त्या नव्हे तर जणू कृष्णच त्यांच्या रुपाने माझ्या मदतीला धावायचा.

ताईंनी सर्वांनाच आईसारखे प्रेम दिले, कोण येणार ? त्याला काय आवडते ? ते ते ताई त्यांच्यासाठी करायच्या, कृष्णच तो, अंतर्ज्ञानी, त्याला सर्व कळायचे. असा गुरु आणि त्याचा सहवास मिळायला भाग्य लागते. ते तुमच्या नशीबात असेल तरच तुम्हाला कळेल. कोणी भक्त आला आणि ताई जेवत असल्या तर उठून हात धूवून आलेल्या माणसाच्या हातात आधी ताट वाढून देणार आणि मग स्वतः जेवणार. हे फक्त एक कर्तव्यदक्ष आणि प्रेमळ आईच करु शकते.

मुलांच्या शिक्षणासाठी मी नोकरी सोडून पुण्याला आले. तिथे देखील मला कृष्णाचं अस्तित्व ठायीठायी जाणवलं. माझी पुण्यात राहण्याची सोय माझ्या मैत्रिणीने केली. एक वर्षभर मी भाड्याच्या घरात राहिले. ज्यांच्या घरात मी राहिले त्यांचे नाव श्याम. त्यांनी मला खूप मदत केली. मुलाला ॲडमिशन मिळवून देण्यात जणू कृष्णच त्यांच्या रुपात उभा राहिला. इतरही सर्व मदत न सांगता ते मला करायचे.

१९९२ च्या मेमध्ये पुण्यात माझे स्वतःचे घर झाले. नवीन घर म्हणून ताईंना भेटायला गेले, आनंदाची बातमी दिली आणि "ताई माझ्या नवीन घरी कधी येणार ?" असे विचारले. त्यावर त्या म्हणाल्या "हा म्हणतो लवकरच येईन!" आणि खरोखर आठ-दहा दिवसांत ताई सकाळीच एक दिवस अकस्मात घरी आल्या. मुले शाळेत गेलेली, सर्व घर हिंडून बघितले, ध्यान केले आणि "आज वास्तूशांत झाली" असे सांगितले. मी काही केले नाही. सर्व ताईंनी, माझ्या आईनेच केले. माझ्या मुलांनाही ताईंनी आजीची माया दिली हे मी कधीच विसरणार नाही. अभ्यास कमी झाला आहे, अजून अभ्यास करायला हवा हे त्या हक्काने मुलांना सांगत, चांगले मार्क्स मिळाले की स्वतः त्यांच्या आवडीचे त्यांना खायला करुन देत.

मी पुण्याहून, दुरून यायची म्हणून कित्येकदा कृष्णकुटीरमध्ये राहून सेवा करण्याची संधी मिळाली, सहवास मिळाला, हे भाग्य मला लाभले. ताई दिल्लीला गेल्या त्या परत आल्याच नाहीत. पण त्या सुक्ष्मरुपाने आपल्यातच वावरतात आणि आपल्याकडून त्यांना हवे असलेले सर्व करुन घेतात. त्यांच्या मायेची पाखर सर्व भक्तांना जाणवते. आणि काय हवे!

अशा माऊलीला त्रिवार वंदन...!

# ताई

अजूनही दिन माझा, तिला शोधण्यात जाई
चोहिकडे मी पाहिले, गेली कुठे माझी ताई ?

तसे कळते मला ते, नाही वळतच काही
ती हाक नि ते हसू, पुन्हा दिसणार नाही ?

माझे मला समजेना, काय झाली माझी चूक
कोण शांतवेल आता, माझी पोरक्याची भूक ?

कृष्णा असा कसा सांग, तुझा उरफाटा न्याय
हवी होती ती आम्हाला, तुला गरज ती काय ?

कार्य चालूच राहील, तुझे नुकसान नाही
परी भेटेल का कुठे, पुन्हा कधी अशी ताई ?

अन् निघून जाण्याची, कसली जीवघोणी घाई ?
गेली चोरपावलांनी, आम्हा गाऊन अंगाई

परी रात्री उशीरा, जेव्हा काम माझे चाले
माझ्या भोवतीने सांगा, छाया कुणाची ही हाले ?

सारे जग झोपलेले, दोन डोळे माझे जागे
अशा वेळी उभी राही, ताई माझ्या पाठीमागे

कधी निराश मी होता, फिरे केसांतून हात
मग एकटा कुठे मी, तिची असताना साथ ?

अन् दमलो वाटता, घाले पदराने वारा
तिच्या कृपेनेच चाले, जगण्याचा खेळ सारा

तरी डोळ्यांना दिसेना, तेव्हा सुटे माझा धीर
परी खचित भेटेल, माझा येता पैलतीर !

स्व. गौतम बावडेकर

# चालवू हा पुढे वारसा

शिकविलेस तूच आम्हा
कृष्ण तो आहे कसा
घेऊनि फिरलीस तू
कृष्णभक्तीचा वसा।

पोरक्याने चालण्या पथ
कठीण आहे हा तसा
परी ठेव लेकुरांवर
एक इतुका भरवसा।

स्फूर्तिसाठी शोधू आम्ही
तव पाऊलांचा ठसा
आम्ही चालवू हा पुढे वारसा।

**स्व. गौतम बावडेकर**

# "I MISS YOU TAI"

**Dr. Pradnya Parulekar**

I was asked to pen a few lines on Param Poojya Tai and all my hidden feelings and emotions surfaced.....

Param Poojya Leelatai Karve or our Tai as we all lovingly call her is my All, She means everything to me. For me she is my beloved Mother, my beloved Guru and my beloved Lord Krishna. While writing this, my eyes have filled up automatically with tears as I terribly miss her in person in my life...

I first met Param Poojya Tai in my teens, at a very vulnerable age, when my views on life had not yet been formed. For which I am extremely grateful to The Divine. She was a simple; kind and ever loving Mother to all that I fell in love with her at once. She subtly guided me into my profession and career and whatever I am today is all thanks to Her.

Looking back at my regular visits to Krishna Kutir and Tai, I always marvel at the wonderful phenomenon that unfolded in front of all of us devotees. The way Tai would converse with Sri Krishna and Sri Krishna with Tai is indelibly ingrained in my mind, in my very being! The transition right from Baby Krishna to Yogeshwar Krishna, slowly unfolded in front of our eyes over the years.

Then suddenly She took Samadhi, without even a small indication and I along with every other devotee was stunned, shell-shocked. The only question that came to my mind was: Krishna what do I do now? How will I live? It was as if my whole Life-force had left me. Initially I lived in a void. I only followed Krishna's-Tai's advise in automation. Go to the Centre regularly once a week, offer daily Pooja

Seva to Krishna and do my duty lovingly and giving my hundred percent, and of course cry internally, mourning my loss.

Slowly, very gradually, I calmed down. I started recollecting various conversations with Tai, her various mannerisms when talking with Krishna and her responses to devotees' questions. Her favorite teaching to all – Chant "Om Namo Bhagawate Vasudevaya" whenever possible without counting… I did just that, since there was nothing else I could do. I left the counting to Krishna as she used to say… Over the past years of consistently following her advice, I have started experiencing a subtle change in myself… My thought process itself has changed… Tai's-Krishna's words come to my mind afresh. "Subtly/Unknowingly, you will experience the change in yourself" – This promise given by Him to us is absolutely true!

I have started experiencing His presence in my everyday life; have started experiencing His Love… As Krishna always said, "You will find My presence in the happiness that you experience, in the midst of My devotees, in the beautiful Nature surrounding you, in the work that you do and the goals that you achieve keeping Me in mind." ….. I am experiencing all that and more….

My only regret is that I am not able to discuss all this with my beloved Tai. I regret having asked her such foolish worldly questions at that time, when she could answer me in person. I wish for a moment she were here now in person to answer all the questions that I now have in my mind! I can never say that she is not with me, for she is definitely there with me as is Krishna in a more subtle form. Only I cannot see Her, cannot hear Her talk, cannot touch Her…. I will probably need many more years, may be many more births even to attain That Unmanifest, to experience The Ultimate Bliss!

Krishna I am willing to wait. May Thy Will Be Done!

Sri Krishnarpanamastu!

# मला भावलेल्या श्रीकृष्णभक्त लीलाताई

प्रकाश गाडगीळ
ठाणे

प. पूज्य ताईंची आणि माझी पहिली भेट १९७६ च्या सुमारास अंबरनाथ ऑर्डिनन्स फॅक्टरीच्या क्वार्टर्समध्ये झाली. पूज्य ताई अंबरनाथ येथील ऑर्डिनन्स फॅक्टरीच्या प्राथमिक शाळेत शिक्षिका होत्या. मला ज्योतिष शास्त्राची आवड होती व प. पूज्य लीलाताईंकडे मामा दळवी नावाचे म्हातारे कृष्णभक्त आजोबा राहत होते व ते पाश्चात्य पध्दतीने (सायन) ज्योतिष सांगावयाचे, त्यांच्या ज्योतिषाचा आश्चर्यकारक पडताळा मला यायचा म्हणून मी अनेकदा त्यांना भेटायला जात असे.

१९७८ साली प.पू. ताई अंबरनाथ सोडून बदलापूरला जाधव कॉलनीत रहावयास आल्या. घराचे नाव कृष्णकुटीर होते. घराच्या हॉलमध्ये श्रीकृष्णाची विलोभनीय मूर्ती, हॉलला लागून दोन खोल्या व स्वयंपाकघर होते. दळवीमामांना भेटायला मी ताईंकडे जात होतो. तरीही प. पूज्य ताईंशी माझा एव्हाना फारसा परिचय झालेला नव्हता. १९७९ साली मला नोकरी लागली. एके दिवशी मी बँकेत जात असता मला पू. प्रभूपाद स्वामींची पुस्तके विक्रीस ठेवलेला स्टॉल दिसला. मी सहज तेथे गेलो व जवळजवळ ५-६ पुस्तके खरेदी केली. ती पुस्तके इंग्रजीत होती व अमेरीकेत छापलेली होती व त्यात कृष्णाचे अतिशय सुंदर सुंदर फोटो होते. घरी आल्यावर काय वाटले कुणास ठाऊक, त्यातील सर्व चांगले फोटो काढले व विचार केला हे फोटो घेऊन बदलापूरला जावे. बदलापूरला जेव्हा कृष्णाचा विषय निघाला तेव्हा मी झटकन ताईंना म्हटले, "तुमच्याशी कृष्ण बोलतो मग आमच्याशी कृष्ण कसा बोलत नाही ?" त्यावर प.पू. ताई म्हणाल्या, "थांबा हं मी कॉफी घेते आणि कृष्णाला आवाहन करते, त्या महाशक्तिला बोलावते." थोड्या वेळाने प.पू. ताई बाहेर आल्या, त्यांचा आवाज बदलला होता. मी दिलेले फोटो पहात त्यातील काही निवडक फोटो पाहून हा मी घेऊ ? अशा तऱ्हेने विचारत होत्या व मी हो अगदी अवश्य घ्या असे

म्हणत होतो. एव्हाना माझ्या डोक्यात प्रकाश पडला की ताईंच्या अंगात कृष्ण आला आहे, मी ताईंच्या समोर बसलो. कृष्ण मला म्हणाला, "तू माझ्याकडे यायला निघाला आहेस. तू लग्न कर कारण तुझ्या आईची तशी इच्छा आहे. मी तुझ्या लग्नाला येणार आहे. मी तुमच्यातच आहे. मी तुमच्याहून वेगळा नाही. तुमची श्रध्दा मला बोलावयास भाग पाडते. तू काही न करता तुझ्या गोष्टी आपोआप घडतात". भारावून मी ताईंना नमस्कार करण्यास खाली वाकलो तेव्हा कृष्ण म्हणाला, ताईला नको मला (कृष्णाच्या मूर्तीकडे बोट दाखवून) नमस्कार कर. त्यावर मी लगेच कृष्णाला म्हणालो, माणसात सुध्दा देव असतोच ना? तेव्हा कृष्णाने अतिशय समर्पक उत्तर दिले. तो म्हणाला माणसात पण देव असतो परंतु जेव्हा माणसाला लोक नमस्कार करतात तेव्हा त्या व्यक्तीला घसरण्याचा धोका असतो.

वरील घटनेनंतर हळूहळू लीलाताईंशी माझा परिचय वाढत गेला. साधारण एक ते दीड महिन्यानंतर माझी बदलापूरला फेरी असे. बदलापूरला असंख्य कृष्णभक्त येत. त्या सर्वांना लीलाताईंचे घर म्हणजे आपलेच घर वाटत असे. घरातील सर्वांची वागणूक आलेल्या भक्तांशी आपुलकीची असे. एकदा मी ताईंच्या घरी गेलो होतो. त्यावेळी ताई वाटीतून खीर खात होत्या. मी समोरच बसलो होतो. कृष्ण मला म्हणाला, ये इकडे ये आणि ताईंनी खिरीमध्ये ओम उमटलेला दाखवला. कृष्ण म्हणाला, "मी ओम स्वरुप आहे. मी निर्गुण निराकार आहे. मी कोणता व्यक्तिस्वरुप नाही. मी जन्म व मृत्युरहित असा आहे. विष्णु मी आहे, शंकर मी आहे असे म्हणतो कारण विष्णु व शंकर यांचा जन्म कोठेच झालेला नाही." ताईंच्या कृष्णकुटीरमध्ये कृष्णाची ऐटदार मूर्ती आहे व त्याच्या बाजूलाच शंकराचे काळया पाषाणाचे लिंग आहे. ते शिवलिंग कृष्णाने एका मुसलमान व्यक्तिकडून ३१ डिसेंबर रोजी स्विकारले. कृष्ण म्हणतो, मी सोवळ्या ओवळ्याच्या पलीकडे आहे. तसेच तो म्हणतो, जो आर्ततेने माझा धावा करतो मग ती व्यक्ती कशीही असो त्याच्यासाठी मी धावून जातो.

एकदा असाच मी माझ्या एका ओळखीच्या गृहस्थाकडे गेलो होतो. तेथे एक देवीभक्त आले होते. त्यांनी देवीची आरती सुरु झाल्यावर तांबडे लाल कुंकू हातातून काढले. ते कुंकू घेऊन मी लीलाताईंकडे एकदा सकाळी गेलो व कृष्णाच्या येथे ती कुंकवाची पुडी ठेवली. कृष्णाने लगेच ताईंना मला काही सांगण्यास सांगितले तेव्हा

ताई म्हणाल्या अशा गोष्टी करणे म्हणजे अध्यात्म शक्तिचा अपव्यय आहे व चमत्कार म्हणजे अध्यात्म नव्हे व याला फार किंमत देऊ नये.

लीलाताईंचे संपूर्ण जीवन पाहिले असता असे आढळून येते की दुसऱ्यासाठी चंदनाप्रमाणे झिजणे व त्यात स्वतःला विसरणे हेच त्यांच्या दृष्टीने अध्यात्माचे सार आहे. ताईंच्याकडे कोणतेही अवडंबर नव्हते. कोणत्याही गोष्टीचा, कर्मकांडाचा अट्टाहास नव्हता. सर्व कसे साधे, सरळ, सोपे, सुटसुटीत. ताईंच्याकडे तर अन्नछत्र सदैव चालूच असे. ताईंच्याकडे आलेला भक्त सर्व अर्थाने तृप्त होऊन परत जात असे. ताईंचे कृष्णकुटीर म्हणजे अक्षरशः गोकुळ होते. कृष्णाने ताईंना सांगितलेच होते की पुढे कृष्णकुटीर हे द्वारका होणार आहे. प्रत्येक भक्त येताना कृष्णासाठी काही ना काही गोड, प्रेमाने आणत असे व कृष्ण "स्विकारतो" असे म्हणून प्रेमाची पोचपावती देत असे. काही वेळ, काही दिवस त्याच्या इच्छेप्रमाणे ती वस्तू ठेवत असे. नंतर कोणाला तरी देऊन टाके. कृष्ण म्हणतो देणारा मीच व घेणाराही मीच. मी ज्याला देतो त्याचे व ज्याचे देतो त्याचे असे दोघांचेही भले होते. एके दिवशी एक बाई ताईंच्याकडे आली. तिला काही कारणाने आर्थिक अडचण होती. लगेच कृष्णाने त्याच्या बोटातील सोन्याचे वळे ताईंना त्या बाईस देण्यास सांगितले व ताईंनी ते वळे लगेच त्या बाईस देऊनही टाकले. ताई ह्या सर्व गोष्टी कृष्णाच्या मर्जीसाठी करत. कारण सर्व कर्मे त्या कृष्णार्पणमस्तु या भावनेनेच करत. त्यामुळे आपोआपच त्यांचेकडून निष्काम कर्म घडले.

१९८३ साली लीलाताईंच्या यजमानांचे ह्रदयविकाराने अकस्मित निधन झाले. सर्व भक्तांना क्षणभर असे वाटले असेल की कृष्णाने त्यांचे आयुष्य का वाढवले नाही? परंतू त्यावर कृष्ण म्हणतो की, "मी नियतीच्या बाहेर नाही कारण मीच विधीलिखित लिहीतो ते मीच कसा बदलू?" पतीवियोगाच्या दुःखातून कृष्णानेच पूज्य ताईंना अलगद बाहेर काढले. ताईंची पूर्वपूण्याई पुष्कळच मोठी होती. त्यामुळे ते परब्रह्म ताईंशी बोलले. वेदांचे मूळ असा जो हरि तोच त्यांच्याशी बोलत असे. त्यांना ब्रह्म दिसले. एवढे असूनही तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे, "**नम्र झाला भूतां तेणे कोंडिले अनंता,**" अशी ताईंची स्थिती होती.

ताई प्रत्येकाला आपली कर्तव्ये चोख करावयास सांगत. ताईंनी सर्व सांभाळून शाळेतील नोकरी पूर्ण केली. मुलांकडे, घराकडे कधी दुर्लक्ष होऊ दिले नाही. भक्तांचीही कधी उपेक्षा होऊ दिली नाही. लीलाताई आलेल्या भक्तांना भगवद्गीता वाचण्यास सांगत व गीतामहात्म्य वाचल्याशिवाय केवळ गीता वाचणे निष्फळ आहे असे त्या सांगत. गीतेची पोथी त्या सर्व भक्तांना मुक्त हस्ताने देत. तसेच काही भक्तांना त्या त्यांच्या कुलदेवतेच करावयास सांगत व ते करुन झाल्यावरच कृष्णाकडे येण्यास सांगत. भक्तांना ताई निरनिराळे उपाय सांगत. अर्थात हे सर्व कृष्णाच्याच सांगण्यावरुन त्या करत. ते उपाय किती तरी साधे असायचे. कोणाला कृष्णास रोज पांढले फूल वाहाण्यास सांगत, तर कोणाला गीतेचा एखादा अध्याय वाचण्यास सांगत. तर कोणाला रोज रात्री कृष्णार्पणमस्तु असे म्हणण्यास सांगत. हे उपाय करताना भक्ताला कोणतीच अडचण येत नसे. कृष्णाने गीतेतच म्हटले आहे एक भक्ती तेवढी मुख्य, बाकी सर्व गोष्टी निमित्तमात्र आहेत. म्हणूनच कदाचित ताई एवढे साधेसाधे उपाय भक्तांना सांगत. ज्यास एवढे साधे उपाय करता येत नसतील त्याच्याकडे भक्तीचा निश्चितच अभाव असावयास पाहिजे. एखादा भक्त ताईंना काही गाऱ्हाणे सांगावयास लागला की ताई उजव्या हाताचे बोट डाव्या हाताच्या तळव्यावर ओमकाराप्रमाणे फिरवित व त्या भक्ताला कृष्ण सांगेल तसे उत्तर देत. एकदा ताईंनी मला दोन्ही हातांचे तळवे दाखवले व म्हणाल्या हे बघ उजव्या हातात "श्री" आहे व डाव्या हातात "ॐ" आहे. उजव्या हातात श्री असल्याने या हाताने कितीही दिले तरी कमी पडत नाही.

लीलाताई मला त्यांच्या मुलासारखे मानत यात मी माझे भाग्य समजतो. तसे पाहिले तर त्या सर्वांच्याच आई आहेत. एकदा मी ताईंकडे गेलो होतो. ताई मला म्हणाल्या, आज पहाटे २ ते २.३० च्या दरम्यान मला कोणीतरी आई म्हणून हाक मारली. मी पलंगावर झोपले होते. आता एवढ्या पहाटे कोणी हाक मारली म्हणून डोळे उघडून पाहिले तर समोर २०-२२ वर्षांचा तरुण कसा असेल तसा तेजःपुंज श्रीकृष्ण उभा होता. त्याचा पितांबर पिवळा, शरीराभोवती तेजोवलय व जमिनीपासून ४ बोटे उंच अधांतरी असा उभा होता. कृष्ण ताईंना म्हणाला, आता तुझ्यातील महाशक्ती जागृत झाली आहे म्हणून मी तुला आई या नावाने हाक मारली. कृष्ण ताईंना म्हणाला,

तुला डोळे उघडे ठेवण्याची गरज नाही. तेव्हा ताईंनी डोळे मिटले, तेव्हा ताईंना श्रीकृष्ण अंतरंगात दिसू लागला.

माझ्या ओळखीचे एक सद्गृहस्थ आहेत. त्यांची व माझी भेट थोर स्वामीभक्त प.पू. नाना महाराज परांजपे यांच्याकडे झाली. त्यांना एकदा मी ताईंच्याकडे घेऊन गेलो. ताईंच्याकडील वातावरण पाहून ते फार भारावून गेले व जसे ते प.पू. नानामहाराजांकडे जात तसे ते लीलाताईंच्याकडे जाऊ लागले. आपटा फाटा येथे त्या गृहस्थांचा प्लॉट होता. बाजूला श्रीस्वामी समर्थांचे मंदिर आहे. तेथे त्या गृहस्थांनी कृष्णमंदिर व पूज्य ताईंना राहण्यासाठी म्हणून मंदिरामागे एक छोटी खोली बांधण्याचे ठरवले. ताईंना कृष्णाने जून १९९३ ला कृष्णकुटीर सोडण्यास सांगितले होते. ताईसुध्दा कोणी विचारले तर आपटा फाटा येथे राहण्यास जाणार असल्याचे सांगत. १९९२ च्या चैत्र शुध्द द्वितीयेला त्या मंदिराचे स्थान निश्चित करण्यासाठी व भूमीपूजन करण्यासाठी ताईंना घेऊन आदल्या दिवशी म्हणजेच पाडव्यास संध्याकाळी आपटा फाटा येथे पोहचलो. ताई लगेच उठल्या व त्या प्लॉटमधील एक जागा त्यांनी निश्चित केली. तेथे एक वर्तुळ काढले. त्यात ताईंनी बसून ध्यान केले. त्यावेळी त्यांचे हात मुरली वाजवताना कसे होतात तसे झाले होते व तोंडातून एक प्रकारचा नाद येत होता. २० मिनिटे ताईंनी ध्यान केले. दुसरे दिवशी म्हणजे चैत्र शुध्द द्वितीयेल ताईंच्या हस्ते भूमिपूजन झाले. आपटा फाटा येथे मार्गशीर्ष शुध्द द्वितीया म्हणजेच १२ डिसेंबर १९९६ रोजी एका भव्य व सुंदर मंदिरात पू. ताईंचे हस्ते भगवान द्वारकाधीशाची स्थापना झाली. त्याप्रसंगीही मी उपस्थित होतो. आपटा फाटा येथील परिसर फारच रम्य व साधकांना आकर्षित करणारा आहे. एका बाजूला पाताळगंगा नदी वाहते आहे. भगवान दत्तात्रेय, शंकर, स्वामी समर्थ, मारुती, गजानन महाराज, साईबाबा, तसेच कृष्णसरस्वती व नामदेव महाराज यांची मंदिरे या परिसरात आहेत. पावसाळ्यात तर सर्व वनसृष्टी हिरवीगार झालेली असते. अशा परिसरात लीलाताई राहण्यास जाणार होत्या. पण प्रत्यक्षात तसे घडले नाही. पूज्य ताईंचे महानिर्वाणानंतर मात्र आपटा फाटा येथील ध्यानमंदिरात पूज्य ताईंचे समाधीस्थान निर्माण झाले. भगवान द्वारकाधीशाने त्याचे चरणाशीच जणू ताईंच्या चिरविश्रांतीची व्यवस्था करुन ठेवली होती. एकदा हुबळी येथील सिध्दारुढस्वामींचे समाधीसमोर पूज्य ताई उभ्या असताना "तुझेही असेच समाधीस्थान होणार आहे"

असे कृष्णाने ताईंना सांगितले होते. ही गोष्ट ताईंनी स्वत: मला सांगितली होती.

ताईंचे कृष्णभक्ती प्रसाराचे काम अनेक वर्षे चालू होते. त्याचा सुगंध हळूहळू सर्वत्र पसरु लागला होता. श्रीमती वसुंधरा पटवर्धन यांनी त्यांच्या "संघर्ष" या पुस्तकात लीलाताईंचा उल्लेख करुन त्यांच्या कार्याचा गौरव केला. सेवानिवृत्तीनंतर कृष्णाने ताईंकडून भरपूर कार्य करुन घेतले. जगात सर्वत्र अशांतता पसरलेली आहे. प्रत्येकजण आपापल्या पंथात, मतात अडकून पडला आहे. माणसामाणसांत द्वेष, वैर, मत्सर वाढत आहे, तेव्हा ताईंनी सर्व लोकांत प्रेमाची भावना निर्माण करणे, जातपात, सोवळे, ओवळे या सर्वांना ओलांडून जगात मानवतेच्या धर्माची पताका फडकत ठेवण्याचे लक्ष्य समोर ठेवून जगभर संचार केला. कृष्ण म्हणजे आकर्षून घेणारा, सर्वांच्या आत्म्यांना आपल्याकडे आकर्षित करणारा, अशा कृष्णाच्या भक्ती प्रसाराचे आणि प्रत्येकाची दृष्टी विशाल करण्याचे कार्य ताईंनी हयातभर केले. जनजागृती, आपुलकी, प्रेम, एकात्मता म्हणजेच अध्यात्मशक्तिचा पाया हे प्रत्येकाच्या मनात बिंबवण्यासाठी लीलाताईंनी केलेले कार्य म्हणजेच कृष्णभक्तीचे कार्य.

।।श्रीकृष्णार्पणमस्तु।।

# " विद्या आणि अध्यात्म गुरू"

मनोहर देशमुख
बदलापूर

श्री लीलाताई कर्वे यांना मी प्रथम वंदन करतो ज्या माझ्या आध्यात्मिक गुरु आहेत पण योगायोगाने माझ्या विद्या गुरुही आहेत. माझे वडिल कै. श्री. काशीराम शिवराम देशमुख हे व्यवसायाने शिक्षक होते. ऑर्डिनन्स फॅक्टरी, अंबरनाथ येथे १९४७ सालापासून ते १९७६ सालापर्यंत ते गणित हा विषय शिकवत असत. निवृत्तीच्या वेळी ते मुख्याध्यापकही होते. परम पूज्य लीला कर्वे यादेखील ऑर्डिनन्स शाळेमध्ये हिंदी हा विषय शिकवत. रहायला आम्ही ऑर्डिनन्स कॉलनीमध्ये असल्याने कर्वेबाईंशी आमचे घरचेच संबंध होते.

मी १९६१ सालापासून ऑर्डिनन्स फॅक्टरी व सेकंडरी स्कूल या शाळेमध्ये शिक्षण घेत होतो. १९६९ साली सातव्या इयत्तेमध्ये असताना आम्हाला कर्वेबाई हिंदी विषय शिकवत होत्या. हसरा चेहरा, प्रेमळ स्वभाव उत्साहपूर्ण असं त्यांचे व्यक्तिमत्व होतं. कर्वेबाईंच्या प्रेमाचाच धाक एवढा होता की त्यामुळे त्यांना हातात कधी छडी धरावीच लागली नाही. ओरडायची वेळही क्वचितच यायची. कोणताही विषय शिकवण्याचे कौशल्य त्यांच्याकडे होते त्यामुळे इतर विषयांमध्येही काही अडचण आल्यास विद्यार्थी त्यांना भेटून वैयक्तिक मार्गदर्शन घेत असत. पण हा विषय माझा नाही, संबंधित शिक्षकांना भेटा असा पवित्रा त्यांनी कधी घेतला नाही. त्यामुळे त्या आम्हा विद्यार्थ्यांमध्ये फारच प्रिय होत्या. हुशार विद्यार्थी तर त्यांना विशेष प्रिय होते. त्यांना त्या नेहमी मार्गदर्शन करण्यास तत्पर असत. पण "ढ" असणाऱ्या विद्यार्थ्यांनाही त्या विषय सोपा करुन अभ्यास कसा करावा याबद्दल मार्गदर्शन करत. चंचलस्वभावी माझ्या भावाची अभ्यासातली प्रगती जरा यथातथाच होती. गणित हा आमच्या वडिलांचाच विषय त्याला जड जात असे त्यामुळे त्याचे नुकसान होऊ लागले तेव्हा माझी आई त्याला घेऊन कर्वेबाईंकडे गेली. तेव्हा कर्वेबाईंनी त्याला एक

छानशी कृष्णाची मूर्ती दिली व अभ्यास करण्यापूर्वी व नंतर त्याला रोज नमस्कार कर म्हणजे तुझं मन शांत होईल व केलेला अभ्यास लक्षात राहिल असा सल्ला दिला. त्याने कृष्णाची उपासना केली व त्याचा त्याला फायदा होऊन त्याचा गणित विषय सुटला. आज तो स्वतःच्या पायावर उभा आहे. आजही त्याच्या देव्हाऱ्यात ती कृष्णाची मूर्ती आहे. तिची तो रोज उपासना करतो आहे.

शालेय शिक्षणानंतरही कर्वेबाईंची भेट होत असे तेव्हा त्या आपुलकीने चौकशी करीत व म्हणत, तुम्ही माझे विद्यार्थी आहात, नेहमी सरळ मार्गाने वागा, तुमचे पाऊल कधीही वाकडे पडणार नाही याची काळजी घ्या. अंबरनाथला त्यांच्याकडे बरेच लोक त्यांच्या घरी अडचणी घेऊन भेटायला येत असत. आम्हाला त्याविषयी कुतुहल असे. त्यांच्याशी कृष्ण बोलतो असे समजले पण त्या विषयावर कधी बोलणे झाले नाही. त्या नेहमी म्हणत  की सरळ स्वभावाचे विद्यार्थी मला विशेष आवडतात. त्यांनी केलेल्या संस्कारांमुळे आमचेही पाऊल कधी वाकडे पडले नाही.

कोल्हटकर, गाडगीळ हे त्यांचे काही सहशिक्षकही होते. वडिलांच्या निवृत्तीनंतर १९८० मध्ये आम्ही बदलापुरला  रहायला आलो. मी महाराष्ट्र विद्युत मंडळामध्ये नोकरीला लागलो. घर लहानसे होते. परिस्थितीही बेताचीच होती, पण भाड्याचे घर नको स्वतःचे घर व्हावे अशी सर्वांची इच्छा होती. एका घराचा पर्याय समोर आला. घर ठीकठाक होते पण आजुबाजूची वस्ती ठिक नव्हती. द्विधा मनस्थिती होऊ लागली तेव्हा विचार आला की कर्वेबाईंना भेटूया व त्यांचे मार्गदर्शन घेऊया. बाईंना भेटल्यावर श्रीकृष्णाची प्रार्थना करुन थोडावेळ थांबून त्या म्हणाल्या, "श्रीकृष्ण म्हणतो, तू आत्ता घाई करु नकोस, एक वर्षाच्या आत तुझे चांगले घर होईल. पैशाचीही काळजी करुन नकोस, सर्व व्यवस्थित होईल." आम्ही कृष्णाला नमस्कार करुन परत आलो.

असेच काही दिवस गेले, भाड्याच्या घराच्या भिंती मातीच्या होत्या. एक दिवशी अचानक काळ्या मुंग्यांचे वारुळ फुटावे अशा भरपूर मुंग्या घराच्या भिंतीवर दिसल्या. आम्ही घाबरुन गेलो व कर्वेबाईंना भेटून सर्व हकीकत सांगितली. त्यावर त्या म्हणाल्या, घाबरु नकोस, मुंग्या आपोआप जातील. आनंदाची बातमी आहे, घरी लक्ष्मी येणार आहे, नवीन घर होणार आहे, आणि खरोखरच ऑफिसमधून बरेच

दिवसांपासून मिळायचे बाकी असलेले माझे येणे मला एकदमच मिळाले. त्या पैशात माझे चांगले घर झाले. श्रीकृष्णाने सांगितल्याप्रमाणे वर्षाच्या आतच हे सारेकाही जुळून आले. त्यावेळी बाईंना आम्ही भेटायला गेलो. त्यांनाही आनंद झाला. त्या म्हणाल्या, मनोहर सरळ वागणाऱ्या भक्तांच्या श्रीकृष्ण सदैव पाठीशी असतो. त्यांनी मलाही एक श्रीकृष्णाची मूर्ती दिली व त्याची नित्य उपासना करायला सांगितली, ९० सालची ही गोष्ट. आजही ती मूर्ती माझ्या देवघरात आहे. तिची नित्य उपासना चालू आहे. अशा रितीने माझ्या विद्यागुरु असलेल्या कर्वेबाई माझ्या अध्यात्मिक गुरु झाल्या. कर्वेबाई म्हणजे परम पूज्य लीलाताई आहेत हेही कळले. श्रीकृष्णाच्या कृपेने आज मी सुखी, समाधानी जीवन जगत आहे.

आज पूज्य ताई असत्या तर त्यांनी ८० वर्षे पूर्ण केली असती. श्री द्वारकाधीश मंदिरातील त्यांचे समाधी मंदिरासही १० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने त्यांच्या विषयीचा आदर व्यक्त करण्याची संधी मला मिळाली याचा फार आनंद वाटला.

✣ ✣ ✣

# भक्तीलीला - पूज्य लीलाताई कर्वे

डॉ. मीरा केसकर,
सानपाडा, नवी मुंबई

बदलापूरच्या थोर कृष्णभक्त परमपूज्य लीलाताई कर्वे अकरा वर्षांपूर्वी कृष्ण चरणी विलीन झाल्या. पण आजही हजारो घरे अशी आहेत की जिथे रोजच्यारोज श्रीकृष्णाबरोबरच लीलाताईंच पुण्यस्मरण घडतं. कृष्णापाठोपाठ त्यांनाही हात जोडले जातात तसेच गीताध्ययन करण्यासोबतच ताईंच्या साध्यासोप्या शिकवणुकीला अनुसरुन जीवनमार्ग आक्रमिला जातो.

भगवान श्रीकृष्णाची गीतेतील शिकवण पूज्य लीलाताईंनी आधुनिक काळाला अनुरुप करुन सुलभ रीतीने सांगितली. ताईंनी हे कार्य निष्ठेने आणि अत्यंत प्रेमाने केले. कृष्णापेक्षा वेगळ असं त्यांच्या शिकवणुकीतच काय, पण त्यांच्या व्यक्तिमत्वातच वेगळं असं काही उरलेलं नव्हत. तन मन धनच नव्हे तर सर्वस्वच त्यांनी कृष्णाला अर्पण केल होते आणि तेच तर त्यांच्या आणि श्रीकृष्णाच्या सतत संवादाचं रहस्य होतं. एकदा थोड्या वेडेपणाने अन् भाबडेपणानेच कुणी त्यांना विचारलं की, "कृष्ण तुमच्याशी बोलतो, तर तो कसा दिसतो, काय बोलतो अन् त्याचा आवाज कसा आहे" ? त्यावर चटकन अगदी सरळपणे त्या म्हणाल्या, "अहं, तो दिसतो किंवा त्याचं बोलणं ऐकू येतं असं नाही. पण ते मनातच येत आपोआप." किती निःष्कपट, निर्मम, निःस्पृह आणि निःसंग अस उत्तर होते ते! कोणताही अभिनिवेश तिथे नव्हता, अध्यात्मिक अधिकाराचा देखावा नव्हता की काही सारवासारवीची चलाखीही नव्हती. जेव्हा एखादा भक्त "मी आणि माझं" या विषयांना, विचारांना तिलांजली देऊन फक्त "तो आणि त्याचीच इच्छा" यांच्याशीच एकनिष्ठ राहतो, त्यालाच स्वसमर्पण करतो तेव्हाच त्या भक्ताच्या त्या निःसंग, निःाष्कपट, निस्वार्थी, निर्लेप अशा खोल डोहासारख्या शांत, स्थिर मनात त्याच्या मनोगताचं प्रतिबिंब पडू शकत. परमपूज्य ताईंच्या संदर्भात नेमक हेच घडत होते. स्वार्थमूलक अशा कोणत्याही विचाराने मनाच्या डोहात एखादा तरंगसुध्दा उमटता

कामा नये हीच त्या कृष्णाची एकमेव अट असते. हेच गीतेतील भक्ताच्या वर्णनाच सारतत्व आहे. ही अट प्राणपणाने सांभाळणाऱ्या ताई या श्रेष्ठ भक्त होत्या. ध्यानी, मनी, स्वप्नी केवळ श्रीकृष्णच! म्हणूनच श्रीकृष्णाच मनोगत त्यांना अचूक समजत होतं. संभ्रमित अवस्थेत असणाऱ्या, वाट चुकलेल्या त्यांच्या लेकरांना योग्य मार्ग दाखवण्याचीच त्याला चिंता! हे योग्य मार्गदर्शन करण्यासाठी योग्य व्यक्ती म्हणून तो ज्या मोजक्या भाग्यवंतांची निवड अनेक कसोट्या लावून करतो, त्यापैकी एक म्हणजे ताई! त्यांनीही श्रीकृष्णाने जे जे कार्य त्यांच्यावर सोपवल ते पूर्णार्थाने, सर्वार्थाने पार पाडलं, किंबहुना तेच त्यांच जीवितकार्य होतं. **अगा जयाचे जे विहीत। ते ईश्वराचे मनोगत। तेचि केलिया विभ्रांत। सापडेची तो।।** या ज्ञानदेवांच्या उक्तीप्रमाणे आपल्या या विहीत कार्याची जाणीव त्यांना फार लहाणपणीच झाली होती आणि ते विभ्रांतपणे करण्यानेच तो भेटणार याचा त्यांना पूर्ण विश्वास होता. याच विश्वासाने, श्रध्देने त्यांनी प्राथमिक शिक्षिकेची नोकरी निरलसपणे पूर्ण काळ केली. लहान मुलांच्या निर्मळ, निष्कपट मनोविश्वाशी एकरुप होऊन त्यांनी ज्ञानदानाच कार्य मोठ्या प्रेमाने केले आणि एकीकडे नोकरी चालू असतानाच कृष्णाने सोपवलेले कार्यही अविश्रांतपणे केलं. त्यासाठी वेळीप्रसंगी आपला संसार, मुलं, बाजूला ठेवून कृष्णभक्तांना प्राधान्य दिलं, स्वत:चे सुख, चैन, आराम यांचा क्षणभरही विचार न करता कृष्णकार्यात स्वत:ला झोकून दिलं.

कृष्णकुटीरमध्ये येणाऱ्या कृष्णभक्तांना अगत्याने बसवून, विचारपूस करुन त्यांची समस्या निवारण करुन, चहा पाणी प्रसाद देऊनच निरोप दिला जायचा. पण हे सगळं करताना ताई मात्र सदैव उभ्याच असायच्या, भक्ती, ज्ञान, वैराग्य, कर्मनिष्ठा यांच्या कोरड्या तत्वचर्चा ताईंनी कधी केल्या नाहीत. पण हे दिव्य सद्‌गुण त्यांनी आपल्या वृत्तीतच साठवले होते आणि आपल्याच जीवनातून त्यांचा आदर्श वस्तुपाठ कृष्णभक्तांसमोर त्यांनी सातत्याने ठेवला.

कर्मनिष्ठा ही त्यांच्या शिकवणुकीची आधारशिला म्हणता येईल, ज्यासाठी आपण वेतन घेतो ते काम नोकरदारांनी नेकीने करावं, व्यावसायिकांनी आपला व्यवसाय सचोटीने करावा, गृहिणींनी आपली गृहकर्तव्य प्रेमाने करावी, विद्यार्थ्यांनी अभ्यास मन:पूर्वक करावा, "लाभार्थी" होण्यापेक्षा "कर्तव्यनिष्ठ" असाव हे त्या

आवर्जून सांगत, कर्तव्यात चुकारपणा केलेला त्यांना चालत नसेच, पण ताईंसाठी म्हणून कोणी कामात चालढकल करु लागले तरी अशा वेळीही त्या पटकन म्हणत, आपल्याला बाबा आधी "ड्यूटी" केलेली आवडते आणि त्या भक्ताला त्याच्या कर्तव्याकडेच कटाक्षाने वळवत.

समर्थ रामदास स्वामींनी म्हटले आहे, "**सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो चालवील तयाचे। परंतु तेथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे।।**" ताईंच्या शिकवणुकीत हाही भाग अत्यंत महत्वपूर्ण होता. तुमच्या सर्वच कर्मांना भगवंताचे अधिष्ठान असू द्या. मात्र या भक्तीच्या, श्रध्देच्या क्षेत्रात त्यांनी कर्मकांडाचा फाफटपसारा कधी मांडला नाही. उपास तापास, व्रतवैकल्य किंवा झगमगाटी पूजा यांचा "त्याला" सोस नाही की महत्व नाही. "त्याला" तुमची फक्त दृढनिष्ठा हवी आहे. मनात शंका आली की तुम्ही त्याला दुरावता, तो तुम्हाला दुरावत नाही. पण तुमच्या श्रध्देची कसोटी पाहत तो काही काळ तटस्थ राहतो. त्यात तुमचं मात्र फार मोठं अहित असत, हे त्या कटाक्षाने सांगत आणि त्यापेक्षा महत्वाचं म्हणजे "ओम नमो भगवते वासुदेवाय" या मंत्राने त्याला साद घालणं! ध्रुव बाळाला प्रत्यक्ष भक्तश्रेष्ठ नारदमुनींनी ज्या द्वादशाक्षरी मंत्राचा उपदेश केला तोच हा महामंत्र, सिध्दमंत्र! या मंत्राचा जमेल तेव्हा, जमेल तेवढा जप करावा, माळा घेऊन जप मोजण्याचा आटापिटा करु नये, हे त्या वारंवार आवर्जून सांगत.

ताईंच्या व्यक्तिमत्वातील अत्यंत महत्वाची आणखी एक गोष्ट म्हणजे त्यांची विनम्रता, निःस्पृहता, गुरुबाजी करणाऱ्यांचे पेव फुटलेल्या आजच्या जमान्यात अध्यात्मिक अधिकार असूनही ताईंनी त्याच कधीच भांडवल केल नाही. "मी कुणाची गुरु नाही, कुणी माझा शिष्य नाही. आपला सर्वांचा गुरु तो एक "श्रीकृष्ण" आहे हे नेहमीच लक्षात ठेवा, असे त्या सांगत. संकटाच्या काळी त्यालाच हाक मारा, त्याचाच धावा करा. फक्त म्हणा, "ये रे कृष्णा" आणि पहा तो येतो की नाही ते, हे त्या इतकं ठामपणे आणि आग्रहपूर्वक सांगत की त्या शब्दांनीच मनाला मोठा दिलासा मिळे आणि ताईविषयीचा आदर द्विगुणितच काय पण शतगुणित होई. ताई हयात असेपर्यंत त्यांनी स्वतःच्या तसबिरी छापून त्यांचे भक्तजनांमध्ये पूजेसाठी वाटप होऊ देण्याचा खटाटोप कुणालाही करु दिला नाही हे त्यांच्या निर्मम विनम्रतेचेच द्योतक आहे.

ध्रुवतारा सदैव आपल्या स्थानी अढळ असतोच, पण अज्ञानी मनुष्याला कोणी ज्ञानी व्यक्तीने बोटाने निर्देश करुन तो दाखववावा तेव्हाच त्याला तो आनंद, ते दर्शन घेता येतं. माझ्यासारख्या कित्येक अज्ञानी जनांना अशाच आनंदाचा अनुभव ताईंमुळे लाभला. अन्यथा **जेथे जातो तेथे तू माझा सांगाती। चालविसी हाती धरुनिया।** हे संतशिरोमणी तुकाराम महाराजांचे शब्द ईश्वरसान्निध्याची ग्वाही चारशे वर्षांपासून ढळढळीतपणे देत आहेतच. पण भवसागरात आकंठ बुडालेल्या आमच्यासारख्यांना त्याची खात्री नसते. अशावेळी त्यासाठी एखाद्या थोर विभूतीला पुन्हा भूतलावर अवतीर्ण व्हावं लागत. ताईंचा जन्म हा जणू अशाच अवतारकार्यासाठी झाला होता. तुम्ही भगवंताला साद घातलीत की तो धावत येणारच, हे अत्यंत आत्मविश्वासाने, सहजतेने आणि ठामपणे त्या सांगत आणि अशाच अनुभवांची देवघेव कृष्णकुटीरमध्ये सतत चालू असे. तो शुभसंस्कार आणि दृढश्रध्दा घेऊनच भक्त परतत. त्यामुळेच जीवनाची बिकट वाटचाल सुकर, सुलभ झाल्याचा अनुभव हजारो कृष्णभक्तांनी घेतला.

**कर्षयति इति कृष्ण :** आकर्षून घेतो म्हणून तो कृष्ण असा या शब्दाचा अर्थ, प्रेमळ माता, आदर्श शिक्षिका, साध्वी, अगत्यशील गृहिणी, श्रेष्ठ भक्त, आर्जवी स्नेही अशा कित्येक पैलूंनी मोहवणाऱ्या परमपूज्य लीलाताईंच व्यक्तिमत्व "कृष्णस्वरुप" होत ते या अशाही अर्थानं! त्यामुळेच पूर्वी बदलापूरची ओढही कृष्ण आणि ताई अशी द्विकेंद्री असायची. ज्या क्षणी ताई देह सोडून कृष्णस्वरुपात विलीन झाल्या तेव्हापासून ही ओढ एककेंद्री झाली आहे. आता ताई आणि कृष्ण दोन वेगवेगळे असे नाहीतच।

✣ ✣ ✣

# निष्काम कर्मयोगिनी - स्व. लीलाताई कर्वे

स्व. राधिका घैसास

भगवान श्रीकृष्णांच्या गीतेमधील वचनांनुसार आपले सारे जीवन व्यतीत करणाऱ्या वंदनीय विभूती म्हणजे बदलापूर येथील थोर कृष्णभक्त स्व. कृष्णस्वरुप लीलाताई कर्वे. "काळाप्रमाणे मी बदलतो" या भगवान श्रीकृष्णाच्या वचनानुसार त्या त्या काळाला अनुरुप परिस्थितीनुसार संतमहात्मे जन्म घेतात. स्व. ताईंचे श्रीकृष्णसमर्पित जीवन ही भगवंताची जणू योजनाच होती.

श्रीमद्भगवद्गीता हा आपला धर्मग्रंथ आहे. आपल्या वाट्याला आलेली कर्मे योग्य प्रकारे प्रेमाने बजावणे म्हणजे धर्म. हीच शिकवण पूज्य ताईंनी त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला दिली. धर्म, जातपात, स्पृश्यअस्पृश्यतेचा कोणताच भेदभाव ताईंकडे नव्हता. "मी एक निमित्तमात्र आहे. कर्ता करविता तो आहे" असे नम्र उद्गार सतत त्यांच्या मुखातून येत असत. किर्ती व प्रसिध्दिची अभिलाषा, संपत्तीचा मोह, परिवाराची आसक्ती, सुखोपभोगाची लालसा ही कधीही त्यांच्या मनाला शिवली नाही. निष्काम कर्मयोगिनीचे जीवनच त्या जगल्या.

गीतेत भगवान श्रीकृष्णांनी आत्मज्ञानीची लक्षणे सांगितली आहेत. दैवी, चैतन्ययुक्त, पूर्ण ज्ञानात पक्का स्थिर, आसक्ती अनासक्ती विरहीत, भौतिक जीवनातील त्रिविध दु:खांचा विसर, मालकी आणि ममतेच्या भावनांचा त्याग, निर्मोह अशा प्रकारच्या गुणांनी युक्त याला आत्मज्ञानी म्हणजेच स्थितप्रज्ञ असे म्हणतात. सद्गुरु ताई अशाच स्थितप्रज्ञ आत्मज्ञानी होत्या. सदैव कृष्णभावना भावित असणाऱ्या ताईंनी कशाचीच आसक्ती ठेवली नाही. निर्वाणसमयी घराचा मोहसुध्दा त्यांना स्पर्श करु शकला नाही. स्वत:चा निर्वाणसमय माहीत असूनसुध्दा कोणालाही त्याचा थांगपत्ता लागू न देता निर्वाणाच्या काही दिवस आधी स्वत:चे म्हणून जे काही वस्त्रे, अलंकार इ. होते ते कपाटे खुली करुन त्यांनी भक्तांना आपापल्या हाताने

घेऊन जाण्यास सांगितले.

सद्‌गुरु लीलाताई सदैव कृष्णभावात मग्न असत. वास्तविक कोणत्याही कर्माची त्यांना आवश्यकता नव्हती. भगवंताकडे मागणी केल्यास सर्व काही मिळू शकत होते. परंतु गीतेतील कर्मयोग त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणला. त्यांच्या प्रत्येक कर्माला त्यांनी अध्यात्म बनवले. कोणत्याही प्रसंगात त्या भगवंताला कधी विसरल्या नाहीत. येणाऱ्या प्रत्येक भक्ताला त्यांनी व्यावहारिक उपदेश केला. नोकरी सोडू नका, पैशाची उधळमाधळ करु नका. तो निकड समयी वापरा. कोणत्याही प्रसंगात शांत रहा. दक्ष रहा असे वेळोवेळी त्या सांगत असत.

सद्‌गुरु माऊली ताईंनी स्त्री म्हणून प्राप्त झालेली सर्व कर्तव्ये स्वधर्माचे पालन समजून प्रेमाने निभावली. सर्व सांसारिक कर्तव्ये पार पाडली. कन्या, सून, माता, सासू, आजी या प्रत्येक नात्याला त्यांनी जपले. बालपणी दुसऱ्या कुटुंबात राहून निःस्पृहतेने छोटी मोठी कामे करुन शिक्षण घेतले आणि मोठेपणी शिक्षिकेची नोकरी केली. अशा प्रकारे सेविका म्हणून त्यांनी अत्यंत निष्ठेने आपले काम केले. सुख दुःखात पतीराजांना साथ दिली. पती निधनानंतरही कोणाकडून कसलीच अपेक्षा न ठेवता आपल्या मुलांना मोठे केले. जीवनामध्ये सुखामागुन दुःख आणि दुःखामागून सुख येत असते. पूर्ण सुख वा पूर्ण दुःख कोणाच्याच वाट्याला येत नाही. जीवनभर श्रीकृष्ण आज्ञेचे पालन केले आणि त्यातच आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता मानली.

मी अजन्मा आहे आणि सर्व प्राण्यांचा ईश्वर आहे. तरीही प्रत्येक युगात मी माझ्या दिव्य स्वरुपात अवतीर्ण होतो असे भगवान श्रीकृष्ण सांगतात. पूज्य ताईंच्या रुपात आपल्याला याची प्रचिती येते. श्रीकृष्णांनी सांगितलेले तत्वज्ञान प.पू. ताईंच्या मुखातून प्रसंगानुरुप आपोआपच येत असे. गुरुमाऊली ताई सत्व, रज, तमोगुणातीत होत्या. पूर्ण ज्ञानात म्हणजे भगवंत स्वरुपात त्यांची वृत्ती स्थिर असल्याने त्यांचे कर्म ज्ञानातच लय पावलेले होते. सद्‌गुरु ताईंचे समाधी अवस्थेतील निर्वाण हाच त्यांचा "ज्ञान कर्मसंन्यास योग."

गीतेत भगवान श्रीकृष्ण सांगतात "कर्मसंन्यासापेक्षा भक्तीयुक्त कर्म अधिक चांगले आहे. श्रेष्ठ आहे." लीलाताईंच्या ठिकाणी सर्व सिध्दि हात जोडून उभ्या होत्या.

त्यांना खरेतर कर्माची आवश्यकता नव्हती. तरी त्यांनी कर्माचा त्याग केला नाही. जो जो कोणी भगवंतांना शरण गेला त्या त्या भक्ताच्या पाठीशी त्या भक्कमपणे उभ्या राहिल्या. जागोजागी श्रीकृष्णलीलाकेंद्रांची स्थापना, श्रीकृष्णमंदिरांची स्थापना, विश्वजननीची प्रतिष्ठापना, सदोदित भक्तांसाठी ध्यान, भक्तांच्या विविध समस्यांची कृष्णभावनाभावित होऊन सोडवणूक, अध्यात्मिक मार्गदर्शन हे सारे त्यांनी प्रपंच करुनही साधले, त्यांनी प्रपंच परमार्थ बनवला.

सर्व कर्मे भगवंतांना समर्पण करुन अनासक्त भावाने स्वत:ची कर्तव्ये करीत राहिल्या.

पूज्य लीलाताईंनी पूर्ण कृष्णमय जीवन व्यतीत करुन ब्राह्मी स्थिती प्राप्त करुन घेतली. कर्मकांडांवर ताईंचा कधीच भर नव्हता. ४-४ तास पूजा करणे, २४-२४ तास जप करत बसणे आणि आपल्या कर्तव्यकर्मांचा विसर पडणे या गोष्टी ताईंना कधीच मान्य नव्हत्या. भक्तीमार्गाची शिकवण त्या अव्याहत देत राहिल्या. उदाहरणार्थ, उरळीकांचनजवळील डाळींब या गावामध्ये सद्‌गुरुमाऊली ताईंच्या अनुमतीने ७ ऑक्टोबर, २००१ रोजी "गोकुळ" या श्रीकृष्णमंदिराचे भूमिपूजन कोणतेही कर्मकांड न करता "ॐ नमो भगवते वासुदेवाय" या मंत्राने झाले. तसेच तेथील गृहप्रवेशही "ॐ नमो भगवते वासुदेवाय" या मंत्रानेच झाला व तीच त्या घराची वास्तुशांत.

ताई ॐकार ध्यानात सदैव मग्न असत. ॐकार हेच ताईंचे सर्वस्व होते. ॐकार ध्यानात त्यांना महासमाधी प्राप्त झाली. त्या अक्षर म्हणजे अविनाशी अशा परमधामाला गेल्या. भगवान म्हणतात मनुष्य जेव्हा परमस्थानाला पोहचतो, तेव्हा तेथून तो कधीही परत येत नाही. तेच माझे परमधाम होय.

**अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्। यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशय:।।**

प. पू. ताईंनी त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला भक्तीमार्गावरून चालण्यास शिकवले. प्रपंचात राहूनही भक्तीयोगाने, कर्मयोगाने भगवंताची प्राप्ती होते हे त्यांच्या स्वत:च्या आचरणातून भक्तांनी प्रत्यक्ष अनुभवले. प्रपंच सोडण्यास गुरुमाऊलींनी

कधीच कोणास सांगितलेले नाही. कर्तव्यतत्पर रहा आणि कर्तव्य करत असताना ते प्रेमाने करा. प्रेमातून भक्तिभाव जागृत होतो. ही प्रेमयोगाची शिकवण ताईंनी सर्वांना दिली. श्रीकृष्ण म्हणजे प्रेम असे त्या नेहमी कौतुकाने सांगत असत. भक्तांवर त्यांचे निरतिशय प्रेम होते. स्वतःची मुले आणि भक्त असा भेद आम्हाला त्यांच्या ठायी कधीच दिसला नाही. कोणी भक्त दुःख, संकटे यांनी खचून ताईंकडे जेव्हा येत असे तेव्हा त्या त्याला "शांत रहा" असे सांगत. कोणत्याही परिस्थितीत मनाचा तोल जाऊ देऊ नका. मनाचा तोल ढळल्यास श्रध्दा विचलित होते. श्रध्दा विचलित झाल्यास त्याचे दुष्परिणाम अटळ असतात. म्हणूनच "शांत रहा" हा त्यांचा महान संदेशच होता. श्रीकृष्ण पाठीशी असल्याचे त्यांचे हे भक्कम आश्वासनच होय.

सत्त्व, रज आणि तम गुणांनीयुक्त श्रध्देविषयी भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितले, "लोकांची श्रध्दा त्यांच्या प्रकृती स्वभावाप्रमाणे असते" सद्‌गुरुमाऊली ताई भक्तांना नेहमी सांगत असत, भगवान श्रीकृष्ण म्हणतात, "श्रध्दा आणि विश्वास ही माझी दोन पावले आहेत. श्रध्देला तडा जाऊ देऊ नका. विश्वासाने माझ्याजवळ या. कर्तव्याला विसरु नका. ते करत असताना प्रेमाने करा म्हणजे माझा कृपाशीर्वाद तुम्हाला मिळेल. तुमच्यातील ओंकाराची जागृती व्हायला त्याची फार मदत होईल."

सर्व भक्तांना गुरुमाऊली ताईंनी प्रेम संदेश दिला. भक्तांमध्ये सात्त्विकगुण वाढीसाठी त्या सतत प्रयत्नशील होत्या. अनेक भक्त ताईंच्या परिसस्पर्शाने बदलले.

भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाचा मोह नष्ट करुन त्याला कर्तव्याची जाणीव करुन दिली. त्यासाठी भगवद्‌गीतेद्वारा संपूर्ण ज्ञान अर्जुनाला दिले. शेवटी अर्जुनाचा मोह नष्ट होऊन तो स्वकर्तव्य बजावण्यास, युध्द करण्यास तयार झाला. आधुनिक काळामध्ये युध्द या शब्दाची व्याप्ती बरीच विशाल आहे. प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या तऱ्हेने युध्दाला सामोरे जावे लागते. त्यासाठी अगदी रणांगणावरच जायला पाहिजे असे नाही. रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग हे अगदी खरे आहे. अशा वेळी मन ताब्यात ठेऊन, त्याला थोडा लगाम घालून, सारासार विवेकाने हे प्रसंग कसे हाताळावे हे सद्‌गुरुमाऊली ताई आपल्याकडे येणाऱ्या भक्ताला सांगत असत.

सद्‌गुरुमाऊली ताईंचे संपूर्ण जीवन म्हणजे चालती बोलती गीताच होय.

✣ ✣ ✣

# पालखी

निघाली निघार ी पालखी
भक्तांच्या माऊलीची पालखी निघाली
माऊली आमुची शांत ती झोपली
नका हो नका हो तिला जागवू कोणी।।

कृष्णाने तिजला अलगद झेलले
रत्नजडीत सिंहासनी तिला हो ठेविले
ऋषी मुनी देव सर्व हजर जाहले
पुष्पवृष्टी करुन तिची स्वागतची केले।।

माऊली हासली कृष्णालागी बोलली
नश्वर काया टाकूनी रे तुझ्याकडे धावली
कार्य तुझे ईश्वरा बहुतची केले
भक्तासाठी कृष्णा फार मी धावले।।

धावता धावत काळ फार गेला
श्वास श्वास भक्तासांठी माझा मी मोजला
भक्तांसाठी कृष्णा आयुष्य मी वेचले
आश्वासन तुझे, मी देवूनी त्यांना आले।।

थकले रे कृष्णा, झोपते मी आता
ह्रदयी तुझ्या ज्योत बनले मी आता
परब्रह्माने तिला अंगाई गाईली
ह्रदयाची शाल तिला पांघरली
माऊली आमुची कृष्णरुप हो जाहली।।

**सौ. कुंदा फणसळकर**
**मुंबई**

# प्रार्थना

**ॐ नमो भगवते वासुदेवाय**

जिचा जन्म कृष्ण-कृपार्थ झाला
जिने वास कृष्ण-भक्तीत केला
जिच्या हृदयी सर्वदा कृष्णवस्ती
नमस्कार त्या गुरु लीला चरणावरती

✿✿✿✿✿

# माऊली

माऊली ग माऊली, भक्त तुझ्या द्वारे आले
तुझ्या छत्रछायेखाली सारे विसावले
तुझ्या हसण्याने, त्यांना मंत्रमुग्ध केले
तुझ्या प्रेमरसामध्ये ओले चिंब झाले
माऊलीने बहू उपकार केला
कृष्ण-सखा हृदयीचा आम्हा भेटविला

✿✿✿✿✿

**सौ. कुंदा फणसळकर**
**मुंबई**

# अजानवृक्षाची छाया

सौ. गौरी जोशी,
मुंबई

आळंदीला ज्ञानेश्वरमाऊलींचे समाधीजवळ अजानवृक्ष आहे, अधिकाधिक काळ या अजानवृक्षाच्या छायेत बसून भक्त ज्ञानेश्वरीचे अध्ययन करतात. ज्ञानेशांशी जवळीक साधायला अजानवृक्षाची छाया मस्तकी असावी लागते, असे म्हणतात. बदलापूरच्या स्व. पूज्य लीलाताई कर्वे या आम्हा सर्व भक्तांच्या अजानवृक्ष होत्या. या अजानवृक्षाच्या छायेत जे जे आले, त्यांना त्यांना श्रीकृष्ण परमात्म्याच्या मायेचा लाभ झाला.

लीलाताई एक प्रसन्न, वात्सल्य मूर्ती. आम्हा सर्वांची ताई, नव्हे आई. स्व. ताईंच्या वयाला या महिन्यात ८० वर्षे पूर्ण झाली असती. हा सोहळा आम्हा भक्तांमध्ये साजरा करण्यासाठी ताई आज हयात असत्या तर आम्हा भक्तांना ती एक मोठी पर्वणीच ठरली असती. पण या प्रसंगाच्या निमित्ताने त्यांच्या असंख्य आठवणींचा पूर आज ओसंडून वाहत आहे.

काही माणसे अध्यात्मिक किंवा संत म्हणून खूप प्रसिध्द नसतात. ते त्यांचे ध्येयही नसते. पण ती अध्यात्म जगणारी असतात. परमपूज्य लीलाताई कर्वे अशा दुर्मिळ व्यक्तींपैकी एक. त्या अध्यात्म जगणाऱ्या होत्या. त्यांच्यातील अध्यात्माचा हा झरा अभिजात, जन्मजात होता. ताई म्हणजे पाझरती भक्ती. दुसऱ्याला विश्वास, दिलासा देणारी. अगदी नास्तिक माणसालाही देवाच्या अस्तित्वाविषयी निःशंक करणारी, श्रध्दा वाटायला लावणारी, श्रध्दा जागवणारी.

कितीही संकटे, मनस्ताप ओढावलेला असू देत, एकदा का बदलापूरच्या कृष्णकुटीरमध्ये प्रवेश केला की मनोमन प्रसन्न आणि आत्मनिर्भर अशा, व्यवहारापासून एका वेगळ्या जगात गेल्यासारखे वाटे, हा प्रत्येक कृष्णभक्ताचा अनुभव असायचा.

शांती, प्रेम आणि कृष्णभक्ती हे ताईंच्या जीवनाचं सूत्र होतं. माणूसकी हेच त्यांच्या धर्माचं साधंसुधं तत्व होतं. ताईंचं विचार करणं, उठणं, बसणं, बोलणं, जेवणं, झोपणं सगळं जगणच कृष्णामय होतं. मानवता हा धर्म व "ओम नमो भगवते वासुदेवाय" हा मंत्र, हाच यज्ञ आणि हीच आराधना करा, हे एवढच त्यांनी आम्हा सर्व भक्तांना सांगितलं. लीलाताईंची भक्ती, त्यांचं अध्यात्म हे इतक सोपं, साधं, सरळ होतं. कोणत्याही प्रकारचं कर्मकांड वा खर्चिक उपाय नसत. पण, "कृष्णा कृष्णा" अशी हाक मारुन ताई जेव्हा कृष्णाशी बोलायच्या तेव्हा त्यांची ती हाक व कृष्णाशी बोलणं पोटातून, अंतःकरणातून आलेल असायचं, हे बघणाऱ्याला जाणवायच. कसलाही चमत्कार नाही, अवडंबर नाही, होती ती श्रध्दा. मीरेची श्रध्दा, राधेची श्रध्दा, जी आजवर आपण फक्त पुस्तकातूनच वाचलेली, भिजून आपल्यासमोर प्रत्यक्ष उभी असायची, ती पहायला मिळणं, अनुभवणं हे खरच, आमच्या ताईंच्या कृष्ण परिवारातल्या कृष्णभक्तांचं भाग्यच, जे आम्ही अनेक वेळा उपभोगलं.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या १६व्या अध्यायात माणसाला जीवनात होणारे आनंद आणि त्यांचे परिणाम यांचे वर्णन केले आहे. त्यात दुसऱ्याच्या आनंदात स्वतः आनंद घेणाऱ्या आनंदाला त्यांनी फार मोठे स्थान दिले आहे. ते योगिक सामर्थ्य आहे, असे ज्ञानेश्वरांचे म्हणणे. ताईंनी ह्या आनंदाची प्रचिती आम्हा सर्व भक्तांना भरभरुन दिली. कृष्णकुटीरमध्ये आलेल्या प्रत्येकाच्या वैयक्तिक, सांसारिक अडचणी तर ताईंनी सोडवल्याच. ते अनुभव सांगावे तेवढे थोडेच. पण, एक अनुभव सांगण्याचा मोह आवरत नाही.

विश्वकल्याणासाठी, विश्वशांतीसाठी सामुहिक प्रार्थना, नामस्मरण करण्यासाठी देशात-परदेशात ठिकठिकाणी अनेक केंद्रे ताईंनी उभारली. त्यापैकी एक केंद्र माझ्या घरी चालू आहे. त्या केंद्राच्या उद्घाटनाला ताई स्वतः माझ्या घरी आल्या होत्या. त्यानंतर माझ्या घरी ताईंच येणं झालं नव्हत. एक ४/५ वर्षांनी अशाच काही निमित्ताने ताई त्यांच्या भक्तांच्या घरी येणार होत्या. बदलापूर-चर्चगेट-व्हाया गोरेगाव ते बदलापूर असा त्यांचा दौरा होता. गोरेगावला आणखीन एका घरी केंद्राची स्थापना व दुसरीकडे जाऊन त्या पुढच्या प्रवासाला निघणार होत्या. या कार्यक्रमानंतर त्यांनी थोडा वेळ तरी माझ्या घरी यावं अशी माझी मनोमन इच्छा होती.

कृष्ण माझ्या घरी येईल का ? या विचारांनी मी रात्रभर झोपले नाही. मनात सारखे विचार येत होते. ताई आज इतक्या भक्तांकडे जाणार. माझ्या दारावरुन त्यांची गाडी जाणार. मग माझ्याकडे यायला त्यांना जमेल का ? दुसऱ्या दिवशी ताईंचे सर्व कार्यक्रम ठरल्याप्रमाणे व्यवस्थित पार पडत होते. गोरेगावच्या दुसऱ्या केंद्राची स्थापना झाल्यानंतर ताईंनी मला हाक मारली व म्हणाल्या दुसऱ्या भक्ताच्या घरुन आपण १५ मिनिटांत निघू. तुझ्याकडे येऊन थोडावेळ ध्यान करुन मी जाणार आहे, मी आ वासून ताईंकडे बघत राहिले तर त्या म्हणाल्या, काय करणार, वेळ नाही आहे. पण काल रात्रभर तळमळत होतीस ना. मग कृष्णाला तुझ्याकडे दोन मिनिटांसाठी का होईना यावेच लागणार. तिथून ताई माझ्याकडे आल्या. कलिंगडाच्या तीन छोट्या फोडी खाल्ल्या, तीन घोट पाणी प्यायल्या व आम्हाला आशिर्वाद देऊन गेल्या. कृष्णाच्या, ताईंच्या प्रेमाचा ज्यांनी अनुभव घेतला, ती व्यक्ती कायमची सश्रध्द झाली. ताईंची झाली. कृष्णाची झाली.

लग्न संसाराचे पाश नसलेली विठ्ठलभक्तीत लीन होऊन गेलेली जनाबाई, लग्न संसारात असून विरागी होऊन कृष्ण हाच संसार मानणाऱ्या राधा, मीरा यांची भक्ती म्हणजे भक्तीची एक उच्चतम अवस्था. या विरागी संतांइतकच लीलाताईंचं कृष्णात तल्लीन होणं, कृष्णमय जगणं उत्कट होतं. कृष्णभक्तीबरोबरच आपली कर्तव्येही त्यांनी तेवढ्या उत्कटतेने, समरसतेने पार पाडली, एवढंच नव्हे तर त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाला त्यांनी कृष्णभक्तीची आस दिली.

ताईंचे वेगळेपण इथेच संपत नाही. वैयक्तिक, कौटुंबिक कर्तव्यांबरोबरच सामाजिक कर्तव्यांची, राष्ट्रीय जबाबदारीची त्यांची जाणीवही सतत जागृत असायची. म्हणूनच सीमेवर लढणाऱ्या जवानांसाठी, देशासाठी त्या सतत ध्यान करीत असत. फक्त स्वतःसाठी प्रार्थना करत राहू नका तर समाजासाठी, देशासाठी, सर्व मानवतेसाठी करा असे त्या सतत सांगत व त्यासाठीच त्यांनी जगात ठिकठिकाणी विश्वशांतीसाठी, विश्वकल्याणासाठी सामुहिक प्रार्थना केंद्रे सुरु केली. धार्मिकतेतून सामाजिक बांधिलकी वाढावी, असा त्यांचा आग्रह असे.

✦✦✦

# वैद्यो नारायणो हरिः

डॉ. पिंपुटकर,
नेरळ

**शरीरे जर्जरे भूते व्याधिग्रस्ते कलेवरे।**
**औषधं जान्हवी तोयं वैद्यो नारायणो हरिः।**

रोगाने ग्रस्त होऊन जर्जर झालेल्या शरीराला परमात्मा श्रीहरी वैद्य तर गंगाजल हेच औषध होय.

**अच्युत अनंता गोविंद नामोच्चारण भैषजात।**
**नश्यंति सकल रोगाः सत्यं सत्यं वदाम्यहम्।**

कोणतीही दुर्धर व्याधी अच्युत, अनंत, गोविंद अशा नामस्मरणाच्या रुपातील औषधाने बरी होतेच हे त्रिवार सत्य आहे.

अशा प्रकारची सुभाषिते आपल्या वाचनामध्ये येतात. प्रत्येकाचा त्यावर विश्वास बसतोच असे नाही. पण जेव्हा स्वतःवर आजार येतो, संकट येते, त्यावेळी नकळतपणे प्रत्येकजण श्रीकृष्णाला किंवा आराध्य दैवताला शरण येतो. डॉक्टरही रुग्णाच्या नातेवाईकांना सांगतात, "आम्ही केवळ उपचार करतो, बरे करणे त्याच्या हाती. We treat..... He cures!!"

बदलापूर येथील कृष्णकुटीरमध्ये आलेल्या हजारो कृष्णभक्तांच्या मनामध्ये मात्र या कृष्णवचनावर शंका येणे अशक्य आहे. कारण परमपूज्य लीलाताईंच्या माध्यमातून वावरताना कित्येक श्रीकृष्णभक्तांना वैद्यराज कृष्णाच्या औषधांची प्रचिती आलेली आहे. "माझा शब्द आहे, माझी जबाबदारी आहे", असे दृढपणे सांगून भक्ताला संकटातून वाचवणारा भक्तवत्सल, भक्तसखा, तर कधी अहंकारी व्यक्तीच्या गर्वाचे हरण करणारा द्रष्टा शिक्षक, तर कधी भगवद्गीतेच्या श्लोकातील

कालानुरुप संदर्भ सांगणारा मार्गदर्शक, अशा अनेक भूमिका धारण करणारा लीलाकृष्ण आपल्या भक्तांसाठी डॉक्टरही होत असे.

श्रीकृष्णलीलावली या पुस्तकामध्ये कृष्णभक्तांनी आपल्या अनुभवांचे वर्णन करताना लीलाताईंनी-कृष्णाने दिलेल्या औषधांचा आवर्जून उल्लेख केलेला आहे. या अनुभवांचे वर्णन वाचताना असे स्पष्टपणे जाणवते की त्याने कित्येक भक्तांना पुढे येऊ शकणाऱ्या आजारांबद्दल सावध केले होते. तर कितीतरी भक्तांचे आधुनिक उपचारांनी असाध्य असणारे आजार केवळ साध्या घरगुती औषधांनी बरे केले होते. कित्येक वेळा लीलाताईंनी कृष्णभक्तांवरील गंडांतर दूर व्हावे म्हणून स्वतः ध्यान केले.

आयुर्वेदामध्ये औषधोपचाराचे तीन प्रकार वर्णन केले आहेत.

१. दैवी चिकित्सा - देवाचे तीर्थ / प्रसाद भक्षण करणे, देवाचे ध्यान करणे.

२. स्तवावजयन - प्राणायामाद्वारे रुग्णातील आंतरिक शक्ती वाढवणे.

३. औषधोपचार - व्याधिविरोधी औषधांचा वापर करणे.

लीलाताईंच्या माध्यमातून कृष्णाने आपल्या भक्तांसाठी चिकित्सेच्या वरील तीनही अंगांचा वापर केला. सर्व सृष्टीचाच व्यापार चालवणाऱ्या परमात्म्याला कठीण ते काय, हेच खरे! आपली श्रध्दा दृढ हवी, केवळ हीच त्याची "फी" आहे.

कृष्णाने सांगितलेल्या औषधांचे काही अनुभव वर्णन करत आहे.

एका कृष्णभक्ताच्या डोळ्याला रांजणवाडी झाली होती. ती बरेच दिवस बरी होत नव्हती म्हणून ऑपरेशन करावे असा डॉक्टरांचा विचार होता. पण कृष्णाने त्यांना ऑपरेशन न करण्याचा सल्ला दिला व कंकोळ खायला सांगितले. कृष्णाचे हे औषध घेताच रांजणवाडी फुटली. त्यानंतर ते डॉक्टरांना भेटायला गेले. त्यावेळी त्यांची ब्लडशुगर तपासली असता ती ४८० जी.एम्.एल्. झालेली होती. अशावेळी ऑपरेशन करणे अशक्यच होते.

डायबेटीस, ब्लडप्रेशर, युरीन इन्फेक्शन अशा वेगवेगळ्या आजारांनी त्रस्त झालेल्या कृष्णभक्ताला कृष्णकुटीरमध्ये तो दर्शनासाठी आला असता, चिमटीभर

धण्या-जिऱ्याची पावडर भांडाभर पाण्यामध्ये रात्री भिजत घालून सकाळी ते पाणी गाळून पिणे, असे कृष्णाचे औषध ताईंनी सुचविले. शिवाय अर्धा ग्लास सोडा व अर्धा ग्लास दूध पंधरा दिवस किंवा महिन्यातून एकदा घेण्यास सांगितले. १५-२० वर्षांपासून सुरु असलेली ॲलोपॅथिची सर्व औषधे बंद होऊन त्या भक्ताचे सर्व विकार दूर पळाले. आता ते फक्त कृष्णाला नैवेद्य दाखवलेल्या कार्ल्याचा रस आणि आवळकाठी एवढेच औषध घेत आहेत.

मानदुखीने ग्रस्त असलेल्या एका कृष्णभक्ताला कृष्णाने अंडे फोडून त्यामध्ये हळद मिसळून मानेपासून हातापर्यंत लावण्यास सांगितले व थोड्या जिऱ्यामध्ये एक मिरी घेऊन ते चाऊन खायला व गरम पाणी प्यायला सांगितले. त्याचे दुखणे कमी झाले. पुढे कृष्णाने त्यांना ॲक्युप्रेशरची ट्रिटमेंट घेण्यास सांगितले व डॉक्टरांचे नावही सुचवले. त्यामुळे त्या पेशंटची मानदुखी पूर्ण बरी झाली.

ताईंची नात अवंती, अवंतीला एकदा डायरिया झालेला असताना वैद्यकीय उपचारांनी तो बरा होईना. तेव्हा कृष्णाने स्वतः तिला तूप+गूळ+ सुंठ असे औषध करुन दिले. कृष्णाचे सान्निध्य व कृष्णाचे औषध यांच्या एकत्रित परिणामाने अवंतीला लवकरच बरे वाटले.

एका कृष्णभक्ताच्या स्कुटरला अपघात होऊन त्याच्या डोळयाजवळ मार लागला, तेथील मांसही बाहेर आले. गंभीर जखम आहे. ती भरून येण्यास वेळ लागेल व देवाची कृपा म्हणूनच डोळा वाचला असे डॉक्टर म्हणाले. लीलाताईंनी त्यांना कृष्णाचे औषध सांगितले. ३ दिवस साखर + हळद + दूध त्यांना प्यायला सांगितले. ५-६ दिवसांतच त्यांची जखम भरून आली.

कृष्णकुटीरमध्ये येणाऱ्या भक्तांचा एक परदेशामध्ये राहणारा मित्र डायबेटीस, लिव्हरमध्ये बिघाड व लघवीतून रक्त जाणे या त्रासाने ग्रस्त झाला होता. तो कृष्णाला भेटायला कृष्णकुटीरमध्ये आला. लीलाताईंनी त्याला सांगितले, कृष्ण म्हणतो सर्व माझ्यावर सोड. २ महिन्यांत पूर्ण बरा होशील. रोज सकाळी कृष्णाला दूध साखरेचा नैवेद्य दाखवून ते प्यायला सांगितले व तळलेले पदार्थ न खाण्याचे पथ्यही सांगितले. दोन महिन्यांतच कृष्णवचनाप्रमाणे ते गृहस्थ पूर्ण बरे झाले.

ब्लडप्रेशर वाढले तर टबात गरम पाणी घेऊन त्यात मीठ मिसळून पाय सोडून बसायला ताई सांगत. यामुळे ब्लडप्रेशन नॉर्मल होत असे. ऑपरेशन झालेल्या वा अन्य कारणाने शरीरास जखम झालेल्यांना रोज नियमितपणे गरम पाण्यात हळद मिसळून घ्यावयास सांगत. संततीची समस्या असणाऱ्या जोडप्यांना रोज रात्री नियमितपणे पांढऱ्या कांद्याचा तीन चमचे रस घेण्यास सांगत.

अशा अनुभवांतून जी औषधे वर्णन केलेली आढळतात, त्यांचा आयुर्वेदामधील वर्णन केलेला कार्यकारणभाव आपण पाहू शकतो. पण काही अनुभवांमध्ये तर आजार एका व्यक्तीला आणि औषध दुसऱ्या व्यक्तीने घेऊनही त्या व्यक्तीचा आजार कृष्णाने बरा केलेला आढळतो.

अमेरिकेतील एक कृष्णभक्त एक महिनाभर हॉस्पिटलमध्ये दाखल होते. कृष्णाच्या मतानुसार त्यांनी दहा दिवस पालकचे सूप घेणे आवश्यक होते. पण त्या देशातील हॉस्पिटलचे नियम कडक होते. त्यामुळे त्या भक्ताला पालकचे सूप घेणे शक्य होणार नव्हते. त्यावेळी कृष्णाने इथल्या दुसऱ्या एका कृष्णभक्ताला पालकचे सूप दहा दिवस घेण्यास सांगितले. दहा दिवसांतच अमेरिकेतील कृष्णभक्ताच्या प्रकृतीत सुधारणा झाली. तेव्हा कृष्णाने इथल्या भक्ताला पालकचे सूप पिण्याचे बंद करण्यास सांगितले.

एका कृष्णभक्ताच्या मुलाला अपघातामध्ये हाताला जबर मार लागला होता. औषधोपचार करुन त्याला घरी आणले. त्यानंतर त्यांच्या घरातील कृष्णमूर्तीचा हात निखळलेला त्यांना आढळला. त्यांना तो अशुभ संकेत वाटला. त्यामुळे ते घाबरुन कृष्णकुटीरमध्ये आले. त्यावेळी कृष्णाने त्यांना सांगितले की त्या मुलावरचे संकट त्याने स्वत:वर ओढवून घेतले नसते तर त्या मुलाचा हात गेला असता. कृष्णानेच आपल्या गीतेमधील वचनाचे पालन केले.

**अनन्य: चिंतयन्तो माम् ये जना: पर्युपासते।**
**तेषां नित्याभियुष्क्तानां योगक्षेमम् वहाम्यहम्।।**

खरंच आपली काळजी तोच घेत असतो, आपण केवळ काळजी करत बसतो.

कृष्ण म्हणायचा जर तुम्ही माझ्याशी व्यवहाराने वागाल तर मीही तुमच्याशी व्यवहारानेच वागेन. पण जर तुम्ही मला तुमचे सर्वस्व अर्पण केले, मला शरण आलात, संपूर्ण शरणागत होऊन माझ्या शिकवणीप्रमाणे आचरणही केलेत तर तुमची सर्व जबाबदारी ही माझी राहील. प्रत्येकवेळी कृष्णाने हे वचन पाळले.

कृष्णाच्या औषधांनी, साध्या घरगुती उपायांनी दुर्धर रोग कसे बरे होतात? आधुनिक निदान पध्दतींनीही निदान न होणाऱ्या व्याधींचे कृष्णाला ज्ञान कसे होते? असे तर्क लढवणे म्हणूनच व्यर्थ आहे. जेथे सर्व तर्क संपतात, कार्यकारण मीमांसा थांबतात, तेथेच कृष्णाचे अस्तित्व सुरु होते. कृष्णकृपेबद्दल चिकित्सा करण्यापेक्षा कृष्णकृपेचा अनुभव घ्यावा.

**आधी भक्तीचा बिंदु द्यावा मग कृपेचा सिंधु घ्यावा।।**

त्यामुळेच की काय, कितीही मोठे संकट असले तरी कृष्णाकडे, लीलाताईंकडे गेल्यावर एक मोठा आधार मिळायचा व अर्धा आजार तिथेच बरा होत असे. सर्वच कृष्णभक्तांचा आधार असलेल्या लीलाताईंमध्ये कृष्णभक्त कृष्णाला पहायचे. पण आता लीलाताईच कृष्णमय झाल्यामुळे कृष्णामध्ये लीलाताई पहाव्या लागतात.

✢ ✢ ✢

# कृष्णकेंद्राची ओढ!

सौ. जयश्री दि. पिंपळगांवकर
पुणे

आपल्या सद्‌गुरु पूज्य लीलाताई कर्वे यांचे जीवन कृष्णमय होते. श्रीकृष्णावर त्यांची केवळ निःस्सीम भक्ती व प्रेम नव्हते तर श्रीकृष्णाचे संदेश व स्वरुप-दर्शन देणाऱ्या ताई श्रीकृष्ण स्वरुपच होत्या. ताई देहभावाने कृष्णभक्त होत्या, जीवाभावाने साक्षात कृष्ण, प्रत्यक्ष श्रीकृष्ण परब्रह्म परमात्माच होत्या.

श्रीकृष्णभक्तीबरोबरच विश्वजननीची आराधना करण्याची नितांत गरज आहे असे ताईंनी सांगितले. श्रीकृष्ण व विश्वजननी यांचे छत्र आपल्या मस्तकावर असले तर हा संसाररुपी सागर पार करण्यास तुम्हाला अडचण येणार नाही असे आश्वासन ताईंनी कृष्णभक्तांना दिले. कृष्णभक्तांना सुखशांती मिळावी यासाठी त्यांनी कठोर साधना व परिश्रम केले. आजच्या या धकाधकीच्या काळात सामुदायिक प्रार्थनेची गरज आहे हे ओळखून ताईंनी अनेक कृष्णकेंद्र व विश्वजननीच्या मंदिरांची प्रतिष्ठापना केली. त्यांनी योगेश्वराच्या कृपेने अक्षरशः शून्यातून एवढ्या मोठ्या कार्याची निर्मिती केली.

सामुदायिक उपासनेतून अध्यात्म प्राप्तीचा मार्ग पूज्य ताईंनी सांगितला. खरोखरीच केंद्रात येऊन एकमेकांविषयी आपुलकी, आंतरीक प्रेम, श्रध्दा, विश्वास, केंद्राबद्दलची ओढ, मानसिक शांती मिळते. शारीरिक व्याधी हळूहळू दूर होतात. जीवनातील संघर्षावर मात करण्याची शक्ती मिळते. केंद्रामध्ये होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमास जरी हजर होता आले नाही तरी आम्ही मनाने नक्कीच तेथे हजर असतो कारण आम्हास कायम कृष्णाची, ताईंची आणि केंद्राची ओढ असते. कृष्णभक्तांच्या भरकटलेल्या जीवनास केंद्रातील सामुदायिक उपासनेतून आधार मिळतो. केंद्रातील अनेक अनुभव व आठवणींचा ठेवा आमच्याबरोबर असतो त्यामुळे निर्धोक जीवन जगण्याची ताकद आम्हा कृष्णभक्तांना केंद्राद्वारे मिळते. सर्वात आनंदाची व मानसिक

समाधानाची गोष्ट म्हणजे प्रत्येकाच्या प्रसादावर उमटणारा ॐ. यामुळे सर्व कृष्णभक्तांची कृष्णावरील श्रध्दा अधिकाधिक दृढ होते. कृष्णभक्तांना केंद्र हे आधारस्थान वाटते. कृष्णभक्तास या केंद्रातून सतत उर्जा मिळते. भक्तीबरोबर संरक्षण, विश्वास, प्रेम यांची ठेव कृष्णभक्त केंद्राद्वारे आपल्याबरोबर घेऊन जात असतो. या जगात आपल्याला अजून काय हवे ? कृष्णभक्तांच्या सर्व गरजांची पूर्तता ताईंनी कृष्णकेंद्राद्वारे भक्तांस करुन दिली आहे.

अशा या माऊलीस आमचे शतशः प्रणाम !



॥ श्री द्वारकाधीशाचा जयजयकार असो॥

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥



॥ परम पूज्य लीलाताई कर्वे यांचे समाधीस्थान॥

**श्री द्वारकाधीश चॅरिटीज**

श्री द्वारकाधीश मंदिर, साईहरी क्षेत्र
आपटा फाटा, कर्नाळा, जि. रायगड.